cmyk

दैनिक **राज्य लोकतंत्र**

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

बीड - महाराष्ट्र | वर्ष - ४ | अंक-१९३ | बुधवार, दि.६ नोव्हेंबर २०२४ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | • पाने- ४ | किंमत ३ रूपये

## संपादकीय

### बेताल कंठ फुटलेले बाबे!

प्रेमात आणि युद्धात सारे काही माफ असते असे म्हणतात. त्यात आता राजकारणातील युद्धाचाही समावेश करावा लागेल. राजकारणात कोण किती खालच्या पातळीवर जायचे, हे ज्याच्या त्याच्या नीतिमत्तेवर अवलंबून राहील. सध्या राजकारण इतक्या खालच्या थराला गेले आहे की, सर्वसामान्यांना सुद्धा त्याची घृणा वाटू लागली आहे. निवडणुकांचा प्रचार सुरू झाला की, नेत्यांना कंठ फुटतो आणि त्यांचे बरळणे सुरू होते. एखाद्याला का निवडून द्यायचे, त्यांनी कोणती चांगली कामे केली आहेत ते सांगणे राहिले बाजूलाच पण एकमेकांबद्दल आरोप-प्रत्यारोप करणे, उणी-दुणी काढणे सुरू होते, नव्हे त्याला अक्षरश: पेव फुटते. नेत्यांनी प्रचार भाषणात जाहीर वक्तव्ये करताना संयम बाळगणे आवश्यक आहे.

## समाजाचे योगदान वाया जाऊ देणार नाही-मनोज जरांगे

जालना: माझ्या समाजाचे योगदान वाया जाऊ देणार नाही. मी योग्यच करणार आहे. मराठा समाजाने मुलगा म्हणून माझ्यावर विश्वास ठेवावा. शांत राहावे. मी बेईमानी करणार नाही. टेन्शन घ्यायचे नाही, अशा शब्दांत मराठा आंदोलक मनोज जरांगे- पाटील यांनी मराठा समाजाला आश्वस्त केले. अंतरवाली सराटी येथे ते पत्रकारांशी बोलत होते. ते पुढे म्हणाले की, मराठे ६ कोटी आहेत. पण तरीही केवळ पाच-दहा आमदार निवडून आले नसते, तर समाजाने खाली मान घालून जाणे मला सहन झाले नसते. म्हणून आम्ही निवडणूक लढवायचा निर्णय घेतला नाही. आमचा काही राजकारण हा खानदानी धंदा नाही. आम्ही राजकारणासाठी आलो का? मला मराठा समाजाला आरक्षण द्यायचे आहे. हाच आमचा मूळ उद्देश असल्याचे जरांगे पाटील म्हणाले.

# गाळप हंगाम १५ नोव्हेंबरलाच सुरू करा; विस्माची मागणी

**पुणे । प्रतिनिधी**

**राज्यातील ऊस गाळप हंगाम दहा दिवस लांबणीवर पडला तर कारखानदारांसोबतच शेतकऱ्यांना मोठा फटका बसू शकतो. त्यामुळे राज्य सरकारने ऊस गाळप हंगाम १५ नोव्हेंबरपासून सुरू करावा, अशी मागणी द वेस्ट इंडियन शुगर मिल्स असोशियसन्स म्हणजे विस्माने केली आहे. कारण विधानसभा निवडणुकीनंतरच गाळप हंगाम सुरू होईल, अशी चर्चा समाज माध्यमावर सुरू आहे.**

.राज्यात विधानसभा निवडणुकीचं बिगुल वाजले आहे. या निवडणुकीच्या मैदानात बहुतांश साखर कारखानदार उतरले आहेत. त्यामुळे राज्य सरकारने निश्चित केलेल्या गाळप हंगामाची तारीख दोन आठवडे पुढे जाऊ शकते, अशी चर्चा रंगली आहे. विधानसभेसाठी २० नोव्हेंबर रोजी मतदान होणार आहे. तर २३ नोव्हेंबर रोजी निकाल लागणार आहे. परंतु त्यामुळे गाळप हंगाम लांबणीवर पडू शकतो, अशी चिन्हं निर्माण झाली आहेत. विस्माचे अध्यक्ष बी.बी. ठोंबरे बिझनेसलाईन वृत्तपत्राशी बोलताना म्हणाले, ''गाळप हंगाम सुरू करण्यासाठी आधीच उशीर झाला आहे. आम्ही राज्य सरकारकडे ५ नोव्हेंबरपासून गाळप हंगाम सुरू करण्याची मागणी केली होती. प्रांती मंत्रि समितीनं १५ नोव्हेंबर तारीख निश्चित केली.'' असं ठोंबरे म्हणाले. राज्य सरकारनं गाळप हंगाम सुरू करण्यास विलंब केल्यामुळे राज्यातील साखर कारखान्याच्या प्रशासनातील नोकरदारांपासून कामगार, ऊसतोड मजूर, वाहतूकदार यांच्यावर रोजगार गमवण्याची वेळ आली आहे. तसेच शेतकरी देखील गाळप हंगाम सुरू होण्याची वाट पाहत आहेत. असंही ठोंबरे यांनी सांगितले. दरवर्षी साधरण ◀◀ पान २ वर

## संसदीय राजकारणातून शरद पवारांचे निवृत्तीचे संकेत

**बारामती । प्रतिनिधी**

संसदीय राजकारणातून निवृत्त होण्याचे संकेत ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी दिले. यापुढे मी कोणतीही निवडणूक लढणार नाही, असे त्यांनी स्पष्ट केले. सुपे (ता. बारामती) येथे ते बोलत होते. मविआचे उमेदवार युगेंद्र पवार यांच्या प्रचारार्थ आयोजित सभेत ते बोलत होते.

पवार म्हणाले, मी आत्ता सत्तेत नाही. परंतु राज्यसभेत आहे. माझी अजून दीड वर्षे शिल्लक आहेत. ◀◀ पान २ वर

## राज्याच्या पोलिस महासंचालकपदी संजय वर्मा

**मुंबई । प्रतिनिधी**

**निवडणूक आयोगाने मंगळवारी (दि.५) महाराष्ट्राच्या पोलीस महासंचालकपदी संजय कुमार वर्मा यांची नियुक्ती केली. संजय कुमार वर्मा** हे १९९० च्या आयपीएस बॅचचे अधिकारी आहेत.

महाराष्ट्र विधानसभा निवडणुकांपूर्वी केंद्रीय निवडणूक आयोगाने सोमवारी (दि.४) राज्याच्या पोलिस महासंचालक रश्मी शुक्ला यांची बदली केली. काँग्रेस आणि इतर पक्षांच्या तक्रारींवरून केंद्रीय निवडणूक आयोगाने शुक्ला यांच्या बदलीचे आदेश दिल्याचे केंद्रीय आयोगाने स्पष्ट केले होते. तसेच राज्याच्या मुख्य सचिवांना मंगळवार (दि.५) दुपारी १ वाजेपर्यंत पर्यंत तीन आयपीएस अधिकाऱ्यांचे पॅनेल पाठवण्याचे निर्देशही देण्यात आले होते. केंद्रीय निवडणूक आयोगाने पोलिस महासंचालक रश्मी शुक्ला यांना पदावरून हटवल्यानंतर मुंबईचे पोलिस आयुक्त विवेक फणसाळकर यांच्याकडे राज्याच्या पोलीस महासंचालक पदाचा कार्यभार सोपवण्यात आला होता.



महाराष्ट्राचे नवे पोलीस महासंचालक म्हणून संजय वर्मा यांची नियुक्ती झाली. त्यावेळी त्यांचे अभिनंदन करताना परमेश्वर येवले व राज्य लोकतंत्रचे संपादक गणेश मोकाशे

## बीडच्या विकासासाठी संधी द्या!

### नाळवंडी येथून प्रचाराचा शुभारंभ केल्यानंतर डॉ.योगेश क्षीरसागर यांचे जनतेला आवाहन

**बीड । प्रतिनिधी**

**बीड विधानसभा मतदारसंघ विकासाच्या वाटेवर आणण्यासाठी मला संधी द्यावी. मतदारसंघात टक्केवारी घेणाऱ्या आमदारामुळे विकासकामे रखडली असल्याचा गंभीर आरोप महायुतीचे बीड विधानसभेचे अधिकृत उमेदवार डॉ.योगेश भारतभूषण क्षीरसागर यांनी केला आहे. डॉ.योगेश क्षीरसागर यांच्या प्रचाराचा शुभारंभ नाळवंडी जि.प. गटातून करण्यात आला असून ढेकणमोहा येथे मंगळवारी (दि.५) सभा झाली. यावेळी ते उपस्थितांना संबोधित करत होते.**



व्यासपीठावर माजी आमदार जनार्धन तुपे, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे जिल्हा सरचिटणीस बप्पासाहेब घुगे, नाळवंडीचे सरपंच ॲड.राजेंद्र ◀◀ पान २ वर

## डॉ.ज्योती मेटे यांच्या प्रचाराचा जोरदार शुभारंभ

### नगद नारायणाच्या आशीर्वादाने एका आश्वासक पर्वाची सुरुवात-डॉ.ज्योती मेटे



**बीड । प्रतिनिधी**

बीड विधानसभेचे काल चित्र स्पष्ट झाल्यानंतर आज शिवसंग्राम अध्यक्ष अपक्ष उमेदवार डॉ. ज्योती विनायकराव मेटे यांनी दि.५ नोहेंबर रोजी श्रीक्षेत्र नारायणगड येथे नगदनारायण महाराजांचे दर्शन घेत गडाचे मठाधिपती महंत हभप शिवाजी महाराज यांचे आशीर्वाद घेऊन १०१ नारळ वाढवून प्रचाराचा शुभारंभ केला. यावेळी मतदारसंघातील हजारो कार्यकर्ते समर्थक उपस्थित होते. प्रचाराच्या शुभारंभ प्रसंगी डॉ. ज्योती मेटे यांनी जोरदार शक्ती प्रदर्शन केल्याने ''आरंभ है प्रचंड'' अशा कार्यकर्त्यांनी जोरदार घोषणा दिल्या. यावेळी कार्यकर्त्यांचा ◀◀ पान २ वर

## खोटे आश्वासने देऊन नाही तर विकासाच्या जोरावर मी पुन्हा मैदानात-आ.लक्ष्मण पवार



गेवराई । प्रतिनिधी

निवडणुकीच्या तोंडावर खोटे आश्वासने देऊन लोकांची दिशाभूल करत मतदारांच्या समोर हात पसरवणाऱ्यांना जनता ओळखून चुकली आहे. गेवराई मतदार संघात मागील १० वर्षात गाव-वाडी -वस्ती-तांड्यापर्यंत केलेली विकास कामे हीच आपली ताकद असून ◀◀ पान २ वर

## प्रत्येक खासगी मालमत्ता सरकारला ताब्यात घेता येणार नाही

### सर्वोच्च न्यायालयाचा ऐतिहासिक निर्णय

**नवी दिल्ली । वृत्तसंस्था**

सर्वोच्च न्यायालयाने मंगळवारी (दि. ५) खासगी मालमत्तांच्या अधिग्रहणाबाबत महत्त्वपूर्ण निर्णय दिला. घटनेच्या कलम ३९ (बी) अंतर्गत प्रत्येक खासगी मालमत्तेला सामूहिक मालमत्तेचा भाग मानता येणार नाही, असे सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड यांच्या अध्यक्षतेखालील खंडपीठाने स्पष्ट केले आहे.

सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड यांच्या ◀◀ पान २ वर

## मतदार कार्ड आधारशी जोडा, मतदान केंद्र वाढवा

### शिवसेना उबाठाचे निवडणूक आयोगाला पत्र

**मुंबई । प्रतिनिधी**

राज्यात विधानसभा निवडणूकीची आचारसंहिता लागू झाली असून तसेच मतदार यादीतील दुबार नावे आणि बोगस मतदान रोखण्यासाठी आधार कार्डशी, पॅन कार्ड, रेशन कार्ड यांच्याशी जोडले जाते. तसे मतदार कार्ड आधार कार्डशी का जोडले जात नाही असा असा सवाल शिवसेना उबाठा पक्षाच्यावतीने करत प्रत्येक ठिकाणी मतदान केंद्रे वाढविण्याची मागणी शिवसेना उबाठाचे नेते सुभाष देसाई यांनी एका पत्राद्वारे निवडणूक आयोगाकडे केली आहे.

शिवसेना उबाठा पक्षाने आपल्या पत्रात असे म्हटले आहे की, बोगस मतदान आणि मतदारांकडून दुबार करण्यात येणारे बेकायदेशीर मतदान रोखण्यासाठी निवडणूक आयोगाने दुबार नावे असलेल्या मतदाराने एकदा मतदान केल्यानंतर त्या मतदाराचे दुसऱ्या मतदान केंद्रावर असलेले नाव तात्काळ काढून टाकावे. याशिवाय मतदानाच्या दिवशी मतदारांना रांगेत बसण्याची सुविधा, वृद्ध, अपंग मतदारांना सुलभतेने ◀◀ पान २ वर







## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड,दि.५ नोव्हेंबर २०२४

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: ७.५० क्विंटल | २,७११ | २,७११ | २,७११ |
| ज्वारी/हायब्रिड: ४९.०० क्विंटल | २,००१ | २,७०० | २,३०१ |
| मका/लोकल: ७.०० क्विंटल | २,१५० | २,१५० | २,१५० |
| तूर :७.५० क्विंटल | ८,६०० | ८,६०० | ८,६०० |
| उडीद :४.५० क्विंटल | ६,५५१ | ६,८५१ | ६,७०१ |
| बाजरी: ४६.५० क्विंटल | २,१०० | ३,०८० | २,७२६ |
| मुग : १२.०० क्विंटल | ६,७०० | ७,७०० | ७,०७५ |
| सोयाबीन: ५२३.५० क्विंटल | २,९०१ | ४,३०० | ४,०१५ |
| हरभरा: १.५० क्विंटल | ६,८०१ | ७,७०० | ७,२५० |







cmyk

## अग्रलेख

# बेताल कंठ फुटलेले बाबे!

प्रेमात आणि युद्धात सारे काही माफ असते असे म्हणतात. त्यात आता राजकारणातील युद्धाचाही समावेश करावा लागेल. राजकारणात कोण किती खालच्या पातळीवर जायचे, हे ज्याच्या त्याच्या नीतिमत्तेवर अवलंबून राहील. सध्या राजकारण इतक्या खालच्या थराला गेले आहे की, सर्वसामान्यांना सुद्धा त्याची घृणा वाटू लागली आहे. निवडणुकांचा प्रचार सुरू झाला की, नेत्यांना कंठ फुटतो आणि त्यांचे बरळणे सुरू होते. एखाद्याला का निवडून द्यायचे, त्यांनी कोणती चांगली कामे केली आहेत ते सांगणे राहिले बाजूलाच पण एकमेकांबद्दल आरोप-प्रत्यारोप करणे, उणी-दुणी काढणे सुरू होते, नव्हे त्याला अक्षरश: पेव फुटते. नेत्यांनी प्रचार भाषणात जाहीर वक्तव्ये करताना संयम बाळगणे आवश्यक आहे. हयात नसलेल्या, कधीकाळी साथीदार सहकारी असलेल्या व्यक्तींबद्दल किंवा ज्यांचे धडे अभ्यासक्रमात समाविष्ट आहेत, अशा महनीय व्यक्तींबद्दल आताच उपरती आल्यासारखी विधाने करून नको ते वाद निर्माण केले जाऊ नयेत, परंतु आज तसे होताना दिसत नाही. मतदारावर आघात होतील आणि तो संभ्रमित होईल, अशी परिस्थिती निर्माण करून त्यालाच राजकारणाचा एक डाव मानणे ही आजच्या नेत्यांची नियती झाली आहे.

७० हजार कोटी रुपयांच्या सिंचन घोटाळ्याच्या चौकशीच्या फाईलवर तत्कालीन गृहमंत्री आर. आर. पाटील यांनी सही केली होती. त्यांनी माझा केसाने गळा कापला, असा खळबळजनक आरोप उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केला. या आरोपामध्ये आर. आर. पाटलांना सही करण्यास शरद पवार यांनीच सांगितले असा छुपा आरोपही आहे. आर. आर. आबांना जाऊन ९ वर्षे झाली. नऊ वर्षांनंतर अजित पवारांना आपल्या मनातील मळमळ का ओकावीशी वाटली? गेलेल्या व्यक्तीबद्दल काही बोलायचे नसते हे अजित पवारांना माहीत नाही काय? दुसरे म्हणजे तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अजित पवारांना आपल्या निवासस्थानी बोलावून त्यासंबंधीची गोपनीय फाईल दाखवली होती म्हणे. गोपनीय फाईल दाखवण्याचा फडणवीसांना काय अधिकार होता? राजकीय महत्त्वाकांक्षेपोटीच अजित पवारांचे बरळणे सुरू आहे. अजित पवार घड्याळ चोरणारे पाकीटमार आहेत, अशी टीका शरद पवार गटाचे जितेंद्र आव्हाड यांनी केली आहे. अजित पवारांनी घड्याळ चोरले पण त्यांना पोलिस पकडत नाहीत. पोलिस म्हणजे मुख्य निवडणूक आयुक्त, ते त्यांच्याबरोबर आहेत, असेही आव्हाड म्हणाले. आक्षेपार्ह वक्तव्य केल्याप्रकरणी शिवसेना उद्धव ठाकरे गटाचे अरविंद सावंत अडचणीत आले. शिवसेना शिंदे गटाच्या मुंबादेवीतील उमेदवार शायना एनसी यांच्याबद्दल आक्षेपार्ह वक्तव्य केल्याप्रकरणी खासदार अरविंद सावंत यांच्याविरोधात नागपाडा पोलिस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला आहे. या प्रकरणी विधान परिषदेच्या उपसभापती नीलम गोऱ्हे यांनी निवडणूक आयोगाला कारवाईची मागणी करणारे पत्र लिहिले आहे. गुन्हा दाखल झाल्यानंतर अरविंद सावंत यांनी पत्रकार परिषद घेऊन दिलगिरी व्यक्त केली आहे.

विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राज्यातील वातावरण आधीच तापलेले असताना संगमनेर तालुक्यात काँग्रेसचे ज्येष्ठ नेते बाळासाहेब थोरात यांच्या कन्येबद्दल भाजपचे ज्येष्ठ नेते वसंतराव देशमुख यांनी आपल्या भाषणात जी अश्लाघ्य विधाने केली ती अत्यंत संतापजनक आणि निषेधार्ह आहेत. आश्चर्याची गोष्ट म्हणजे देशमुख यांना असे वक्तव्य करण्यापासून कोणीही रोखले नाही. उलट व्यासपीठावरील नेते, पदाधिकारी आणि समोर बसलेले कार्यकर्ते टाळ्या पिटत होते. डॉ. जयश्री थोरात गत काही काळापासून राजकारणात सक्रिय झाल्या आहेत. पुरुषी अहंकारातून राजकारणात उतरू इच्छित असलेल्या महिलेबद्दल अनुचित उद्गार काढणे म्हणजे कोत्या आणि हिडीस राजकारणाचा भाग म्हटला पाहिजे. लाडकी बहीण योजना सुरू करणाऱ्या महायुती सरकारची यामुळे चांगलीच अडचण झाली आहे.

राजकीय कार्यकर्ते महिलांबाबतची अशी मानसिकता बाळगून आपल्या पक्षाची टिमकी वाजवणार असतील तर ही परिस्थिती अतिशय कठीण म्हणावी लागेल. विशेष म्हणजे अशा कार्यकर्त्यांना राजकीय पक्ष पाठीशी घालतात हे सर्वांत धोकादायक आहे. भाजप एकीकडे महिला सबलीकरणाचा नारा देत आहे आणि दुसरीकडे महिलांचा अपमान करत आहे. एकीकडे राजकीय पक्ष न्यायाची चर्चा करतात आणि दुसरीकडे गुन्हेगारी पार्श्वभूमीच्या उमेदवारांना राजकीय आखाड्यात उतरवतात. हे राजकीय पक्षांचे ढोंग म्हणावे लागेल. देशात महिलांवरील अत्याचाराचे प्रकार थांबण्याचे नाव घेत नाही आणि महिला सुरक्षेवरून गंभीर चर्चा सुरू असताना असे लोकप्रतिनिधी निवडून येत आहेत. सत्तेत राहणाऱ्या अशा लोकप्रतिधींकडून न्यायाची अपेक्षा कशी करता येईल? गत काही वर्षांपासून अशा गुन्ह्यांमध्ये वाढ होत आहे. असे आरोप असलेल्यांना खड्यासारखे वेचून बाजूला काढत त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करण्यास सर्वच पक्षांनी प्राधान्य दिले पाहिजे.

## लाडक्या बहिणींच्या भक्कम पाठिंब्यामुळे विजयसिंह पंडित आमदार होतील-विजेता विजयसिंह पंडित



गेवराई । प्रतिनिधी

महायुतीचे उमेदवार विजयसिंह पंडित यांच्या प्रचारार्थ सौ. विजेता विजयसिंह पंडित यांनी गेवराई शहरातील विविध भागात घरोघरी मतदार महिला भगिनींच्या गाठीभेटी घेऊन या निवडणुकीत त्यांना विजयी करण्याचे आवाहन केले. लाडक्या बहिणींच्या भक्कम पाठिंब्यामुळे विजयसिंह पंडित आमदार होतील असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. त्यांच्या घरोघरी भेटीला मोठा प्रतिसाद मिळत आहे. महीला आघाडीच्या पदाधिकारी यावेळी उपस्थित होत्या.

गेवराई शहरातील भगवान नगर, गणेश नगर, गजानन नगर, छत्रपती कॉलनी, कोल्हेर रोड आदी भागातील महिला मतदार भगिनींच्या घरोघरी भेट देऊन संपूर्ण शहर पिंजून काढले. राष्ट्रवादी काँग्रेस व महायुतीचे उमेदवार विजयसिंह पंडित हे आपल्या हक्काचे आहेत. यावेळी तुमच्यासमोर ते उभा आहेत. प्रत्येकाच्या सुखदुःखात आपला संपूर्ण परिवार दत्त म्हणून उभा असतो. त्यांच्या पारड्यात मतांचे सतपात्री दान देऊन लाडक्या बहिणींनी प्रचंड मताधिकाने विजय करून एक नवा इतिहास घडवावा आणि आपल्या हक्काच्या माणसाला विधानसभेत पाठवा असे भावनिक आवाहन त्यांनी यावेळी केले. याप्रसंगी सौ.विजेता विजयसिंह पंडित यांचे महिला भगिनी मतदारांनी घरोघरी जोरदार स्वागत केले. महिलांचा प्रचंड उत्साह यावेळेस पाहायला मिळाला. ठिकठिकाणी त्यांचे यावेळी औक्षण करण्यात आले. यावेळी त्यांच्या समवेत राष्ट्रवादी महिला काँग्रेसच्या तालुकाध्यक्ष सौ. मुक्ता अर्दड ,सौ.योगिता तांबारे, सौ.पल्लवी गोगुले, सौ .अनिता काळे, सौ. किरण दाभाडे, सौ.सविता जगताप, सौ.मीना ढाकणे, सौ.वनिता ढेंगळे सौ. वर्षा बारगजे, सौ.आरती आहेर, सौ.अर्चना आंधळे, सौ. दिपाली जाधव , सौ.उमा मडके, सौ.शकुंतला गायकवाड, सौ.मंदा गौंड, सौ.खरात यांच्यासह असंख्य महिला भगिनी उपस्थित होत्या.

## आज प्रचाराचा शुभारंभ

### सभेला मोठ्या संख्येने उपस्थित रहा अपक्ष उमेदवार मा.आ. भिमराव धोंडे यांचे आवाहन

**आष्टी प्रतिनिधी**

**आष्टी पाटोदा शिरूर विधानसभा मतदारसंघात मी अपक्ष उमेदवार म्हणून उभा आहे. आज बुधवारी दिनांक ६ नोव्हेंबर रोजी आष्टी येथे प्रचाराचा नारळ फोडण्यात येणार आहे तरी मतदारसंघातील मतदार बंधू भगिनींनी प्रचंड संख्येने या जाहीर सभेला उपस्थित राहण्याचे आवाहन माजी आ. भीमराव धोंडे यांनी केले आहे.**



प्रचार शुभारंभाच्या निमित्ताने आष्टी येथील आण्णाभाऊ साठे चौक, लोकनेते गोपीनाथराव मुंडे चौक, छत्रपती शिवाजी महाराज चौक, शनिमंदीर, कमानवेस, डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक, महावीर चौक, महात्मा फुले चौकातून बाजारतळ अशी रॅली काढण्यात येणार आहे. शेवटी छत्रपती शिवाजी महाराज चौकात जाहीर सभा होणार आहे. मी २० वर्षे आमदार असताना आष्टी मतदारसंघाचा सर्वांगीण विकास केलेला आहे. सर्वात महत्त्वाचे म्हणजे मी कधीही जातीयवाद केला नाही. सर्व जाती धर्माच्या लोकांना सोबत घेऊन विकास कामे केली आहेत. सुरुवातीला १५ वर्षे आणि २०१४ ते २०१९ असे पाच मिळून वीस वर्षे मतदारसंघाचे नेतृत्व करीत मतदारसंघासाठी कोट्यवधी रूपयांचा निधी आणून विकास केला आहे. मतदारसंघातील एकही गाव असे नाही की, त्या गावांसाठी निधी दिलेला नाही. विकासकामे करताना कधीही भेद केला नाही. त्याचप्रमाणे शैक्षणिक संस्थांच्या माध्यमातून गावागावात शाळा सुरू केल्या आहेत. ऊसतोड मजूर, शेतमजूर, शेतकरी, कष्टकऱ्यांची मुले, मुली शिक्षण घेऊन नोकरी व्यवसाय करीत आहेत. प्रचाराचा शुभारंभ आज आष्टी येथे होत आहे तरी मतदारसंघातील बंधू व भगिनींनी प्रचंड संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन अपक्ष उमेदवार माजी आ. भीमराव धोंडे यांनी केले आहे.

## आ.सोळंकेंनी मतदार संघात विकासाचे काम करण्यापेक्षा संपत्ती वाढविण्याचे काम केले- माधव निर्मळ

**माजलगाव। प्रतिनिधी**

**माजलगाव मतदार संघाची विद्यमान आमदार व माजी मंत्री प्रकाश सोळंके यांनी माजलगाव मतदार संघाचा विकास करण्यापेक्षा स्वत:ची संपत्ती वाढविण्याचे काम केले अशी तोफ आमदार सोळंके यांचे नाव न घेता अपक्ष उमेदवार माधव निर्मळ यांनी येथील वैष्णवी मंगलकार्यालयात घेतलेल्या कार्यकर्ता मेळाव्यात केले.**



माजलगाव विधानसभा मतदारसंघातील अपक्ष उमेदवार माधव श निर्मळ यांनी माजलगाव शहरातील वैष्णवी मंगलकार्यालयात दि ०५ नोव्हेंबर मंगळवार रोजी परभणी चौक ते वैष्णवी मंगलकार्यालय रॅली काढत शक्ती प्रदर्शन करीत कार्यकर्ता मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते याप्रसंगी विविध विषयावर बोलताना माधव निर्मळ म्हणाले की लोकशाहीचा गळा दाबण्याचे काम विद्यमान आमदार करत आहेत शेतकऱ्यांच्या मालाला भाव नाही शेतकऱ्याच्या उत्पादन खर्च निघत नाही काम झाले की लाथ मारण्याची यांची संस्कृती आहे असेही निर्मळ म्हणाले मला जर विधान भवनात पाठविण्याची संधी मिळाली तर माजलगाव मतदार संघ महाराष्ट्र मध्ये एक नंबर करेल सर्वांना सुखासारखे सरळ करतो त्यांच्या पात्रात भ्रष्टाचार नाही त्याला मतदान करा माझे पात्र निर्मळ आहे याप्रसंगी बऱ्याच वक्त्यांनी आपले समयोचित भाषण केले.

## पान ६ वरून...

### फक्त निवडणूकीपुरते दारात येणाऱ्याला

करायची नव्हती फार करतानीच भाषणात तुम्हीच काय भाषा होती हे जनतेने पाहिला आहे मतदारसंघात कामाचा कुठेच फक्त नारळ एवढ कोटी मंजूर करून बोर्ड लावायचं काम यांनी केले आहे मी आयुष्यात प्रशासकीय ऑर्डर असल्याशिवाय कोणत्याच कामाचा नारळ फोडलेला नाही आणि विरोधक काम झालं नाही की म्हणायचं सूर्यदर्शन ते होतच नाही त्याला विरोध करण्याचा प्रश्नच नाही मात्र आता ही निवडणूक जनतेने हातात घेतली असून २००४ सारखा निकाल लागेल भावना माजी आमदार सुरेश यांनी केले आहे. आष्टी विधानसभा संघातील प्रचाराच्या पहिल्या दिवशी २३१ आष्टी-पाटोदा-शिरुर का. विधानसभा मतदारसंघाचे भाजपा-शिवसेना-रि.पा. ई. (आ) आणि मित्र पक्षांचे अधिकृत उमेदवार सुरेश धस यांनी वनवेवाडी,मातावळी, मातकुळी, चिंचपुर,आष्टा ह.ना.,वाळुंज, इमनगाव,पारगाव जो.,रुटी,बळेवाडी, खानापुर,खडकत,सांगवी आष्टी, टाकळसिंग,हिंगणी,दैठणा, हनुमंतगाव, चिखली,मंगरुळ या गावामध्ये गावभेट दौऱ्याकरून मतदारांशी संवाद साधत साथ देण्याचे आवाहन केले. यावेळी आष्टा गटातील जिल्हा परिषद सदस्य, पंचायत समिती सदस्य, सरपंच, चेअरमन, व्हा. चेअरमन, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य, प्रमुख पदाधिकारी,भाजपा पदाधिकारी, शिवसेना रिपाई आठवले गट व सर्व घटक मित्र पक्षाचे पदाधिकारी यांच्यासह गावागावातील वाड्या,वस्ती, तांड्यावरील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**जनतेनेच धस यांची निवडणूक घेतली हाती**

आष्टी विधानसभा निवडणुकीची रणधुमाळी सुरू आली असून माजी आमदार सुरेश धस यांच्या विजयासाठी गावोची गावे एकवटले असून कार्यकर्त्यांनी प्रचाराची धुरा हातात घेत धस यांच्या विजयासाठी कंबर कसली आहे. जनतेनेच धस यांची निवडणूक घेतली हाती असल्याचे चित्र आष्टी मतदार संघात पाहायला मिळत असून सदैव सर्वांच्या सुखदु:खात हजर असा लोकाभिमुख नेता पुन्हा विधान सभेत पाठवायचा आहे अशी गावागावातून प्रतिक्रिया व्यक्त होत आहेत.त्यांना प्रचंड बहुमताने या निवडणुकीत विजयी करावे अशा भावना नागरिकांतून व्यक्त केल्या जात आहेत...

----------

## पान १ वरून...

### संसदीय राजकारणातून शरद

त्यानंतर राज्यसभेवर जायचे की नाही, याचा विचार मला करावा लागेल. पण मी आता कोणतीही निवडणूक लढवणार नाही. आजवर मी १४ निवडणूका लढवल्या. तुम्ही लोक असे आहात की मला एकदाही घरी पाठवले नाही. प्रत्येक वेळी निवडूनच देत आला. परंतु आता मला कोणतीही निवडणूक नको. सत्ता नको, मात्र समाजकारण करत राहणार आणि लोकांचे काम मी करत राहणार आहे. महाराष्ट्रात नव्या नेतृत्वाची फळी उभा करण्याचा संकल्प आम्ही लोकांनी केले आहे. त्याला तुम्हा लोकांची साथ पाहिजे. उपमुख्यमंत्री अजित पवार हे विविध सभांमध्ये समोरून तुम्हाला भावनिक केले जाईल असे सांगत आहेत. शरद पवार यांनी त्यांच्या या वक्तव्याचा समाचार घेतला. पवार म्हणाले, काही लोक सांगतात मी भावनिक होईल. भावना वगैरे काही नसतात. लोकांच्या मनात जे आहे त्यालाच लोक निवडून देतात. दुसरे काही कारण नाही, कोणालाही भावनिक करण्याची काही गरज नाही. मला आता आमदारकी नको. खासदारकी नको. आता इथल्या लोकांची राहिलेली कामे मार्गी लावणे एवढेच माझे काम असल्याचे ते म्हणाले.

------------

### गाळप हंगाम १५ नोव्हेंबरलाच

ऑक्टोबरच्या तिसऱ्या किंवा चौथ्या आठवड्यात साखर कारखान्यांचा गाळप हंगाम सुरू होतो. त्यामुळे कारखान्यावर लगबग सुरू असते. परंतु यंदा मात्र १५ नोव्हेंबर रोजी गाळप हंगाम सुरू करण्याची तारीख राज्य मंत्री समितीने निश्चित केली. त्यामुळे कारखानदार, ऊस उत्पादक, मजूर, वाहतूकदार गाळप हंगाम सुरू होण्याच्या प्रतीक्षेत आहेत. दरम्यान, महाराष्ट्राच्या शेजारील कर्नाटक, गुजरात आणि मध्यप्रदेश या राज्यांमध्ये १० ते १५ नोव्हेंबरच्या काळात गाळप हंगाम सुरू होईल. त्यामुळे राज्यातील ऊस या राज्यातील कारखाने पळवतील. परिणामी राज्यातील साखर कारखान्यांना ऊस कमी पडेल, अशी चिंता ठोंबरे यांनी व्यक्त केली आहे.

----------

### बीडच्या विकासाठी

राऊत, अरुण लांडे, सुधीर काकडे, नंदकुमार कुटे, संदीप डावकर, स्वरूप राठोड, बंडा राठोड, अच्युतराव शेळके, भिकू शिंदे, भारत कानडे, बाबासाहेब राठोड, तेजाब चव्हाण, शुभम कातांगळे, विनोद हातागळे, विद्याभूषण बेदरकर, शुभम कुलथे, मिलिंद ठोकळ, अभिमान गुंदेकर, दत्तप्रसाद सानप, रामहरी कुटे, अशोक वैद्य, अंबादास पवार, इम्रान पटेल, रघुनाथ पवार, अनिल जाधव, भगवान देवकते, बाबासाहेब काशिद, नागेश शिंदे, प्रभाकर ठिमरे, विष्णू पवार, हनुमंत बांडे, गणेश पवार, तुकाराम जाधव, दीपक सुरवसे, अनिल लोकरे आदींची उपस्थिती होती. डॉ.योगेश क्षीरसागर म्हणले, आजची सभा ही एक नवीन पर्वाची सुरुवात असून पुढील अनेक वर्ष दिशा देणारी आहे. येणाऱ्या काळात बीड शहरासह ग्रामीण भागाचा विकास करायचा आहे. मागील एक वर्षात मतदारसंघात केलेली कामे यामुळे उमेदवारी मिळेल, याची खात्री होती. शहराच्या प्रत्येक वार्डात, गावगावात जाऊन लोकांच्या अडीअडचणी सोडविण्यासाठी सातत्याने पाठपुरावा केला. त्यामुळे त्याचे प्रश्न मार्गी लावले. माजी मंत्री जयदत्तआण्णांनी उमेदवारी मागे घेऊन एकप्रकारे आशीर्वाद दिलाय. त्यांच्या निर्णयामुळे पक्षाला मोठी ताकद मिळेल. सर्व कार्यकर्ते आता जोमाने कामाला लागले आहेत. टक्केवारी घेणाऱ्या आमदारामुळे बीड मतदारसंघाची कामे रखडली. आमदाराने टक्केवारीसाठी कामे अडविली. त्यामुळे अनेक विकासकामे पूर्ण झाली नाहीत. आता ही कामे पूर्ण करण्याची जबाबदारी आमच्यावर आहे. बीड मतदारसंघातील कोरडा दुष्काळ दूर करायचा आहे. सिंचनाचा प्रश्न सोडवायचा आहे. युवकांच्या हाताला रोजगार उपलब्ध करून द्यायचा आहे. चांगले बीड, संपन्न बीड घडवायचे आहे. विरोधकांकडे कसलेच विकासाचे मुद्देच नाहीत, त्यांच्याकडून फक्त जातीपातीचे आणि धर्माचे मुद्दे मांडले जात आहेत, असाही आरोप त्यांनी केला. यावेळी पक्षाच्या पदाधिकारी, कार्यकर्त्यांसह नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**आमदारांनी काय दिवे लावले? -भाऊसाहेब डावकर**

भाऊसाहेब डावकर यांनी आ.संदीप क्षीरसागर यांच्यावर जोरदार टीका करत त्यांनी मागील पाच वर्षात काय दिवे लावले हे सांगितले. तसेच डॉ.योगेश क्षीरसागर यांच्या माध्यमातून सामाजिक प्रश्नांची जाण असणारे, हाकेला ओ देणारे नेतृत्व मिळाल्याचे सांगितले. काकूंचा वासा खऱ्या अर्थाने डॉ.योगेश हेच चालवू शकतात. मागील पाच वर्षाची सल डॉ.योगेश क्षीरसागर यांच्या भरून निघणार असल्याचे देखील त्यांनी उपस्थित नागरिकांना सांगितले.

**डॉ.योगेशभैय्याच्या विजयाचा गुलाल उधळू – सुधीर काकडे**

डॉ.योगेश क्षीरसागर यांच्या प्रचाराची सुरुवात ही गोरक्षनाथांच्या पायथ्याशी झाल्याने त्यांचा विजय कोणीच रोखू शकत नसल्याचे सांगितले. संदीप क्षीरसागर हे विरोधी उमेदवारच नाहीत. कारण त्यांच्यामुळे बीड मतदार संघाचा विकास थांबला असल्याचे सागितले. मागच्या निवडणुकीत जी चूक केली ती यावेळी करू नका सर्वांनी सतर्क राहून काम करा विजय नक्की होणार म्हणून गाफील राहू नका, येणाऱ्या २३ तारखेला डॉ.योगेश क्षीरसागर यांच्या विजयाचा गुलाल उधळू असे सुधीर काकडे यांनी जाहीर सभेत बोलताना सांगितले.

**दिवसरात्र एक करू पण योगेशभैय्यांना आमदाराच करू-बप्पासाहेब घुगे**

निवडणुकीच्या उमेदवारीसाठी अनेक जण प्रयत्न करत असताना डॉ.योगेश क्षीरसागर यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे तिकीट खेचून आणले. उपमुख्यमंत्री अजितदादा पवार, पालकमंत्री ना.धनंजय मुंडे यांची साथ असल्याचे सांगितले. डॉ.योगेश क्षीरसागर यांचे कुठल्याच व्यक्तीशी वैर नसून सर्वांनी त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहून त्यांना आमदार बनवायचे असल्याचे सांगितले. दिवसरात्र एक करू पण डॉ.योगेशभैय्यांना आमदाराच करू असे सांगितले.

**योगेशभैय्या सुख-दु:खात धाऊन जाणारे व्यक्तिमत्व-जनार्धन तुपे**

डॉ.योगेश क्षीरसागर हे सामान्य माणसाच्या सुखा दु:खात धाऊन जाणारे व्यक्तिमत्त्व असल्याचे सांगितले. हे नेतृत्व विधानसभेत गेलेच पाहिजे. संदीप क्षीरसागर यांनी मागील पाच वर्षात कसलेच कामे केली नसल्यामुळे कसलेही पद नसताना बीड मतदारसंघाच्या विकासासाठी मोठ्या प्रमाणत निधी उपलब्ध करून विकास कमी करणाऱ्या डॉ.योगेश क्षीरसागरांचा विजय आजच निश्चित झाला असल्याचे सांगितले.

-----------

### प्रत्येक खासगी मालमत्ता सरकारला

अध्यक्षतेखालील ९ पैकी सात न्यायमूर्तींच्या खंडपीठाने आपल्या निकालात स्पष्ट केले आहे की, ''खासगी मालमत्ता ही समाजाच्या भौतिक संसाधनांचा भाग असू शकते; परंतु एखाद्या व्यक्तीच्या मालकीची प्रत्येक मालमत्ता समाजाच्या भौतिक संसाधनांचा भाग बनली पाहिजे असे नाही.'' या निर्णयासह सर्वोच्च न्यायालयाने न्यायमूर्ती कृष्णा अय्यर यांचा १९७८ चा निर्णय रद्द केला, ज्यामध्ये म्हटले होते की, ''सरकार सर्व खासगी मालमत्ता सामान्य फायद्यासाठी घेऊ शकते.'' सात न्यायमूर्तींच्या बहुमताने दिलेल्या निर्णयात म्हटले आहे की, सरकार खासगी मालमत्ता ताब्यात घेऊ शकते, असा जुना निर्णय विशेष आर्थिक, समाजवादी विचारसरणीने प्रेरित होता. तथापि, सध्याच्या नियमानुसार, सर्व खासगी मालकीची संसाधने यापुढे सरकार अधिग्रहित करू शकत नाहीत. सर्वोच्च न्यायालयाच्या नऊ न्यायाधीशांच्या खंडपीठातील दोन न्यायाधीशांचा निर्णय वेगळा राहिला. न्यायमूर्ती बी.व्ही. नागरथना यांनी खंडपीठाच्या निर्णयावर अंशत: असहमती दर्शवली, तर न्यायमूर्ती सुधांशू धुलिया यांनी पूर्ण असहमती दर्शवली.

----------

### खोटे आश्वासने देऊन नाही तर विकासाच्या

याच विकास कामाच्या जोरावर आपण पुन्हा एकदा विधानसभेच्या मैदानात उतरलो असल्याचे प्रतिपादन आ.लक्ष्मण पवार यांनी केले. गेवराई विधानसभा मतदार संघाचे अपक्ष उमेदवार आ. लक्ष्मण पवार यांनी तलवाडा येथील त्वरिता देवी मंदिर येथे जेष्ठांच्या हस्ते नारळ फोडून आपल्या प्रचाराचा शुभारंभ केला. यानंतर त्यांनी तलवाडा, राहेरी, भोगलगाव, गंगावाडी, आंतरवली यासह ठिकठिकाणी कॉर्नर सभा घेऊन मतदारांशी संवाद साधला यावेळी बोलताना त्यांनी सांगितले की, विरोधक हे प्रत्येक निवडणुकीच्या तोंडावर मतदारांच्या दारात जाऊन खोटे आश्वासने देत मतदारांची दिशाभूल करून हात पसरवत आहेत. परंतु तालुक्यातील सर्व मतदार जनता हुशार असून ते विकासाच्या पाठीशी असल्याचे गेल्या दोन विधानसभा निवडणुकीत दिसून आले आहे. त्याच प्रमाणे गेल्या दहा वर्षांत केलेल्या विकास कामाची पावती म्हणून जनता या निवडणुकीतही आपल्या सोबत राहील असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला. एका लोकप्रतिनिधीने प्रामाणिकपणे काम केले तर मतदार संघाचा किती विकास होऊ शकतो हे आपण गेल्या दहा वर्षाच्या काळात दाखवून दिले आहे. मी दहा वर्षे आमदार होतो या काळात मला साडेसात वर्ष सत्ता काळातील मिळाली अन याच काळात आपण तळागाळातील जनतेसाठी होईल तेवढे प्रयत्न करून मोठ्या प्रमाणात निधी खेचून आणला म्हणून आज आपल्या गावगावच्या रस्त्याचा प्रश्न मार्गी लागला आहे. म्हणून गेल्या दहा वर्षात केलेली विकास कामे हीच आपली ओळख असून याच विकास कामाच्या जोरावर आपण पुन्हा एकदा अपक्ष उमेदवार म्हणून या विधानसभेच्या मैदानात उतरलो असून येत्या २० तारखेला सर्व मायबाप मतदार आपल्या ऑटोरिक्षा या चिन्हसमोरील बटन दाबून प्रचंड बहुमताने मला विजयी करून हा विकास रथ असाच कायम पुढे चालू ठेवतील असा विश्वास आ.लक्ष्मण पवार यांनी यावेळी बोलताना व्यक्त केला. यावेळी मतलवाडा सर्कल मधील गंगावाडी, राहेरी, बोरगाव थडी, येथे भेटीगाठी दौरा सुरू केला. यावेळी सुशील जंवजाळ, राजेंद्र राक्षसभुवनकर, जे.डी.शहा, भगवान घुबार्डे, दादासाहेब गिरी, राजेंद्र भंडारी, मधुकर वादे,शिनुभाऊ बेद्रे, सतिष दाभाडे, याहीया खॉन, शाम कुंड, सय्यद एजाज, देविदास फलके, शेख मोहम्मद, अभिजीत मरकड, अँड सुरेश पवार, काठोड्याचे सरपंच आबु कर्वे, रामेश्वर मस्के,शांलिदर बाबासाहेब कोरे, मतीन कुरेशी, भारत खटके, विष्णु गायकवाड, कृष्णा गायके, पुरूषोत्तम लाड,गोपाल लाड,अगद फलके, शेख मौहमद,राहुल बेडके,विलास तळेकर, अदिनाथ गर्जे, भास्कर गवते, गोरे मामा, यांच्यासह परिसरातील सर्व पदाधिकारी कार्यकर्ते, सरपंच, उपसरपंच, कार्यकर्ते तसेच मतदार बांधवांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

----------------

### डॉ.ज्योती मेटे यांच्या प्रचाराचा

उत्साह शिगेला पोहोचला होता आपल्या नेत्यांना निवडून आणण्यासाठी जीवाचे रान करू अशी यावेळी कार्यकर्त्यांनी शपथ घेतली आहे. लोकनेते विनायकराव मेटे साहेब यांची नारायण गडावर नितांत श्रद्धा होती त्यांनी २०१४ सालच्या आपल्या निवडणुकीतील प्रचाराचा नारळ देखील नारायण गडावरती वाढवून सुरुवात केली होती. त्यामुळे आपण देखील श्री क्षेत्र नारायण गडावरून प्रचाराचा शुभारंभ करत आहोत नगद नारायणाच्या आशीर्वादाने एका आश्वासक पर्वाची बीड मतदार संघात सुरुवात होणार आहे असे मत यावेळी डॉ.ज्योती विनायकराव मेटे यांनी व्यक्त केले या प्रसंगी शिवसंग्राम प्रदेश उपाध्यक्ष प्रभाकर कोलंगडे , सलीम पटेल, जिल्हाध्यक्ष नारायणराव, पुणे जिल्हाध्यक्ष भरत लगड, वाशिम जिल्हाध्यक्ष गजानन इडोळे, पंढरपूरचे डॉ.लोमटे सर, इंदापूरचे गलांडे साहेब, रिसोड तालुका अध्यक्ष वसंत टाले काशीद, जिल्हा सरचिटणीस अनिल घुमरे, बीड विधानसभा प्रमुख प्रा. सुभाष जाधव, बीड तालुका अध्यक्ष नवनाथ प्रभाळे, गेवराई तालुका अध्यक्ष कैलास माने, सुनील शिंदे, कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक पंडित माने, सचिन काळकुटे खरेदी विक्री संघाचे संचालक गोपीनाथ घुमरे, मजूर सहकारी संस्थेचे संचालक बाळासाहेब हावळे, आदीसह बीड जिल्ह्यासह राज्यभरातील शिवसंग्राम चे कार्यकर्ते पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

------------

### मतदार कार्ड आधारशी

मतदान करता यावे यासाठी आवश्यक असणाऱ्या पुरेशा सुविधा, पहिल्या मजल्यावरील मतदान केंद्रात जाण्यासाठी पायऱ्या चढून जाण्याऐवजी रॅम्प लिफ्टची सुविधा, पिण्याचे पाणी-टॉयलेटची सुविधा, मतदान कसे व कोणत्या पद्धतीने करावे आणि त्याच्या सूचना ठळक मोठ्या अक्षरात लिहिलेल्या असाव्यात, मतदान केंद्रात मोबाईल नेण्यास बंदी असेल तर मोबाईल सुरक्षित ठेवण्याची सुविधा करावी, प्रत्येक कामासाठी वेगवेगळे निवडणूक अधिकारी नेमावे, प्रत्यक्ष मतदान प्रक्रियेचे काम शिपाई-पोलिस यांना न देता मतदार रांगांचे नियमन करावे, मतदारांना सोयी देण्याचे कामे त्यांना द्यावीत यासाठी मतदान अधिकारी वाढवावेत अशी सूचनाही यावेळी शिवसेना उबाठा पक्षाने पाठविलेल्या पत्रात केली आहे. त्याचबरोबर मतदान केंद्रावर नियुक्त असलेल्या कर्मचाऱ्यांना भेडसावणाऱ्या समस्यांच्या अनुषंगानेही काही सूचना करण्यात आल्या असून मतदानाच्या दिवशी निवडणूक अधिकारी आणि निवडणूक केंद्र कर्मचारी यांना भोजन देण्यात यावे, भोजनाचा दर्जा चांगला असावा, महिलांना रात्रभर केंद्रावर थांबावे लागते, त्यानंतर त्यांच्या सुरक्षेची तसेच वाहतुकीची कोणतीही व्यवस्था करण्यात येत नाही, प्रिसायडींग ऑफिसर आणि पोलिंग एजंट दोन्ही पुरुष असावेत, निवडणूक साहित्य परत करण्याची जबाबदारी उभय पुरुषांकडे सोपवून महिलांना साहित्य जमा केल्यानंतर कार्यमुक्त करावे, महिलांना स्वतंत्र स्वच्छतागृहे, पिण्याच्या पाण्याची सुविधा, सुरक्षित निवास व्यवस्था, इत्यादी गोष्टींकडे दुर्लक्ष करण्याऐवजी त्या सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, अशा सूचना पत्राद्वारे शिवसेना उबाठा पक्षाच्यावतीने करण्यात आली आहे.

--------------

दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
बुधवार दि. ०६ नोव्हेंबर २०२४


## जेष्ठ नेते ॲड.अनंतराव जगतकर यांनी काँग्रेस पक्षाचा केला त्याग, लवकरच घेणार निर्णय

अंबाजोगाई : माझ्या कडे केज मतदार संघाच्या विकासाचे व्हिजन असताना व मी बीड जिह्यातील काँग्रेस नेतृत्वासह वरिष्ठ नेत्याकडे पाठपुरावा करूनही माझ्या उमेदवारी साठी त्यांनी प्रयत्न केले नाहीत असा आरोप करून आपण काँग्रेस पक्षाचा त्याग करत आहोत अशी घोषणा काँग्रेसचे जेष्ठ नेते ऍड अनंतराव जगतकर यांनी केली.

या वेळी बोलताना ऍड अनंतराव जगतकर म्हणाले की, काँग्रेसचे विभागाजन झालं त्यावेळी काँग्रेस कडे चिट पाखरू राहील नव्हतं. त्यावेळी आम्ही ४ ५ लोकांनी पुनर्बांधनी केली. १९८५ ला विधानसभा तिकीट मिळालं अंतर्गत बंडाळी मुळे पराभव पत्करावा लागला. पूर्वी गॅस एजन्सी साठी अर्ज केला होता. तत्कालीन तहसीलदार पोफळकर यांनी बोलावून मला एजन्सी ला प्रवृत्त केलं. १९८६ ला पाडव्याच्या शुभप्रसंगी गॅस एजन्सी चालू केली. मी काँग्रेसचा प्रदेश प्रतिनिधी आहे. माझ्या कडे केज मतदार संघाच्या विकासाचा मास्टर प्लॅन आहे. त्यामुळे विधानसभा निवडणूक लढवण्या संदर्भात अशोक पाटील यांचा कॉल आला. ऑगस्ट मध्ये नाना पटोले यांनी मला लातूर येथे विचारणा केली. त्या नंतर मुबंई मध्येही मी त्यांची भेट घेतली. मी नंतर सर्व्हे केला. मला उत्तम प्रतिसाद मिळाला. उमेदवारी साठी तयारी केली. मी शरदचंद्र पवार साहेबाना भेटलो. महाविकास आघाडीत काँग्रेसला एक तरी जागा सोडा म्हणून मागणी केली. तुमच्या नेत्याला बोलायला सांगा केज साठी आग्रह धरला नाही. नेते खुशाल आहेत, बीड जिल्ह्यात काँग्रेस संपुष्टात आला आहे. माझ्या सारखा व्यक्ती प्रवाहात राहिला मात्र काँग्रेस पक्षात राहून भवितव्य दिसत नाही, टिंगल टवाळीचा पक्ष झाला आहे. कोणत्या पक्षाला पाठिंब्या द्यायच्या याचा निर्णय नंतर घेईल. यावेळी त्यांनी खा रजनी पाटील यांच्यावर अप्रत्यक्ष तोफ डागत त्यांनी आज पर्यंत काँग्रेस पक्षाला पोषक परस्थिती निर्माण केलेली नाही. माझ्या उमेदवारी साठी काडीचेही प्रयत्न केलेले नाहीत. त्यांनी प्रयत्न केले असते तर केज मतदार संघ काँग्रेस पक्षाला सुटला असता मात्र ते प्रयत्न झाले नाहीत. म्हणून मी काँग्रेस पक्षाचा त्याग करत आहे. माझी ओळख काँग्रेस म्हणून आहे. उद्या राजीनामा पाठवत आसल्याचे त्यांनी सांगितले.

# विद्यार्थ्यांनो उच्च पदस्थ अधिकारी व्हा,पण आपल्या आई-वडिलांना व परिसरातील नागरिकांना विसरू नका- स्वामी महादेवानंद भारती महाराज

**पिंपळवंडी । प्रतिनिधी**

शिक्षण हे सर्वश्रेष्ठ असून शिक्षणानेच यशाचे शिखर गाठता येते.गरीबीतून मोठ बनायचे असेल तर शिक्षणाशिवाय पर्याय नाही. शिक्षणानेच माणूस मोठा होतो. शिक्षणानेच आपल्याला मोठेपण आले.हे लक्षात ठेवून आपल्या शिक्षणात आई-वडिलांचा मोठा वाटा असतो.कोणत्याही उच्च पदावर गेलात तरीही आपल्या आई-वडिलांना व परिसरातील समाजाला विसरू नका असे मार्गदर्शन व उपदेश गुरुवर्य महंत श्री.स्वामी महादेवानंद भारती महाराज यांनी गुणवंत,यशवंत विद्यार्थी यांच्या सत्कार कार्यक्रम प्रसंगी केला.

पाटोदा तालुक्यातील अंमळनेर येथे दि.२ नोव्हेंबर रविवार रोजी प्रतीवर्षाप्रमाणे येथील लोकमान्य नागरी सहकारी पतसंस्था व ग्रामस्थांच्या वतीने परिसरातील उच्च पदस्थ अधिकारी तसेच गुणवंत, यशवंत विद्यार्थ्यांचा नागरी सत्कार सोहळा संपन्न झाला.यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्री.क्षेत्र अश्वत्थलिंग संस्थानचे महंत गुरुवर्य श्री.स्वामी महादेवानंद भारती महाराज तर व्यासपीठावर प्रमुख पाहुणे म्हणून दत्तात्रय शिंदे दुय्यम निबंधक दापोली, ॲड.एन.एन.साबळे सीबीआय पुणे नियुक्ती सरकारी वकील,पटेल पीएसआय,आर.एल.उंडे सर,मनोज पवार सर लोकमान्य नागरी पतपेढी चेअरमन,महादेव साबळे सर,सुमित पांगरे,अर्जुन पवार,बेदरे सर,कैलास पवार सर,अंकुशराव पवार आदींची उपस्थिती होती.अध्यक्ष व मान्यवरांचे शुभहस्ते यावेळी परिसरातील उच्च पदस्थ



### अंमळनेर येथील लोकमान्य पतसंस्थेच्या वतीने गुणवंतांचा सत्कार संपन्न

अधिकारी तसेच वैद्यकीय, आरोग्य,पोलीस विभागात निवड झालेल्या व कार्यरत असलेल्या गुणवंत,यशवंत विद्यार्थ्यांचा शाल, श्रीफळ,फेटा बांधून व स्मृतीचिन्ह देऊन त्यांना गौरविण्यात आले. प्रास्ताविक चेअरमन मनोज पवार सर यांनी केले.लोकमान्य नागरी पतसंस्थेच्या वतीने ४ वर्षापासून राबविण्यात येत असलेल्या या उपक्रमाचे अनेकांनी कौतुक करून हा उपक्रम शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रेरणा प्रोत्साहन देणार आहे.यामुळे विद्यार्थ्यांना या कार्यक्रमातून मोलाचे मार्गदर्शनही मिळते.

स्वामी महादेवानंद भारती महाराज यांनी मार्गदर्शनपर भाषणातून बीड जिल्हा हा धार्मिक,अध्यात्मिक, शैक्षणिक क्षेत्रात खूपच श्रेष्ठ असून या जिल्ह्यात बारा ज्योतिर्लिंगापैकी परळी वैजनाथ तसेच स्वामी बंकट स्वामी आदीसारखे महान संत होऊन गेले.तसेच राजकारणात स्व.गोपीनाथ मुंडे,स्व.प्रमोद महाजन सारखे महान नेते होऊन गेले.तसेच महात्मा गांधी यांनी अहिंसेचा संदेश तर गाडगेबाबा यांनी स्वच्छतेचा संदेश,डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची घटना,ज्योतिबा फुले, सावित्रीबाई,कर्मवीर भाऊराव पाटील यांचे शैक्षणिक कार्य या सर्वांचा आदर्श सर्वांसाठी प्रेरणा देणारा असून त्यांच्या विचाराचा सर्वांनी आदर केला पाहिजे असेही ते म्हणाले.यावेळी पीएसआय पटेल,डि.बी.शिंदे, ॲड.साबळे,उंडे सर,उद्योजक राजेंद्र पवार यांनी भाषणातून चांगले काम करत रहा.यश निश्चित मिळते. पालकांनी आपल्या पाल्यांना खूप शिकवून उच्चपदस्थ अधिकारी बनवा. भावी डॉक्टरांनी गोरगरीब रुग्णांची सेवा करून त्यांचे वर योग्य उपचार करून त्यांचे आशिर्वाद घ्यावेत. चांगल्या कल्पना घेऊन कर्तव्य बजावले तर प्रत्येक क्षेत्रात चांगल्या मार्गाने यश संपादन करता येते असे मार्गदर्शन केले.तसेच यावेळी निवड झालेले विद्यार्थी अनिकेत पोकळे, सुरज पोकळे,अमोल मिसाळ यांनी मनोगतातून आपले अनुभव व्यक्त केले.या कार्यक्रमाला शिक्षक,पालक, डॉक्टर,पत्रकार बबनराव उकांडे,चंद्रकांत पवार,भाऊसाहेब पवार तसेच सुमित पांगरे,अभि पात्रुडकर,भागवत नवले,विठ्ठल नवले,हरि पवार,अनिल हडतगुणे, व्यापारी,ग्रामस्थांसह सर्व स्तरातील नागरिक उपस्थित होते.कार्यक्रमाचे सुत्रसंचालन नारायण नरसाळे यांनी तर आभार प्रदर्शन कैलास पवार सर यांनी केले.कार्यक्रम यशस्वीतेसाठी पतसंस्थेच्या कर्मचाऱ्यांनी व ग्रामस्थांनी परिश्रम घेतले.

## जैतापूरच्या सरपंचाची गोरगरिबांना फराळ वाटप करून दिवाळी साजरी

दिंद्रुड । प्रतिनिधी

धारूर तालुक्यातील जैतापुर येथील सरपंचांनी ग्रामपंचायत हद्दीतील गोरगरिबांसोबत दिवाळी फराळ वाटप करत दिवाळी साजरी केली. गेल्या पाच वर्षांपासून करत असलेल्या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे.



येथील सरपंच छाया भागवत दराडे या गेल्या पाच वर्षांपासून जैतापूर ग्रामपंचायत हद्दीतील जैतापूर,देवठाणा, शेरी तांडा,सजगनी तांडा, नागझरी तांडा या भागातील गोरगरीब, निराधार व दिव्यांग ग्रामस्थांना प्रतिवर्षी दिवाळीच्या औचित्याने दिवाळी फराळ वाटप करतात. जैतापूर ग्रामपंचायत हद्दीतील बहुतांश भाग हा ऊसतोड मजुरांचा परिसर आहे. या भागातील ऊसतोड मजूर ऊसतोडी ला गेल्यानंतर घरातील वयोवृद्ध निराधार व दिव्यांग नागरिकांना दिवाळीचा फराळ सहसा मिळत नाही याच अनुषंगाने आपण सण साजरा करत असताना आपल्या गाव हद्दीतील ग्रामस्थांनी आनंदापासून वंचित राहू नये याकरिता आम्ही हा उपक्रम राबवत असल्याबाबत छाया भागवत दराडे यांनी माध्यमांना सांगितले. गावातील शालेय विद्यार्थ्यांना फटाके, कपडे, शालेय साहित्य दिवाळीच्या औचित्याने करण्यात येते. या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# काझी मुशाहेदोद्दीन यांना दिल्लीत राष्ट्रीय उर्दू शिक्षक पुरस्कार प्रदान

## बीड जिल्ह्याच्या शिरपेचात पुन्हा एकदा मानाचा तुरा

माजलगाव । प्रतिनिधी

राष्ट्रीय उर्दू शिक्षक कर्मचारी संघ दिल्ली कडून काझी मुशाहेदोद्दीन अज़ीज़ोद्दीन यांना यावर्षीचा राष्ट्रीय उर्दू शिक्षक पुरस्कार दिल्ली येथे प्रदान करण्यात आला. यामुळे बीड जिल्ह्याच्या शिरपेचात पुन्हा एकदा मानाचा तुरा रोवला गेला आहे.

काझी मुशाहेदोद्दीन अज़ीज़ोद्दीन हे बीड जिल्हा परिषदेत सहशिक्षक आहेत. सध्या ते माजलगाव तालुक्यातील पात्रूड येथे जिल्हा परिषद उर्दू माध्यमिक शाळेत कार्यरत आहेत. क

काझी मुशाहेदोद्दीन अज़ीज़ोद्दीन हे शिक्षण क्षेत्रात



रुजू झाल्यापासून त्यांची एक कार्य मग्न शिक्षक म्हणून ख्याती आहे. चांगल्या शिक्षणासाठी आणि विद्यार्थ्यांना शिक्षण प्रिय बनविण्यासाठी ते काही ना काही नवीन करण्याचा प्रयत्न सातत्याने करत असतात. ते एक विद्यार्थी प्रिय, चळवळीचे शिक्षक म्हणून संपूर्ण बीड जिल्ह्यात प्रसिद्ध आहेत. त्यांच्या चांगल्या कार्यामुळे आतापर्यंत त्यांना अनेक राज्यस्तरीय व राष्ट्रीय पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. आता त्यांना दिनांक ३ नोव्हेंबर २०२४ रविवार रोजी दिल्ली येथील गालिब अकादमी कडून मान्यवरांच्या उपस्थितीत व हस्ते त्यांना राष्ट्रीय उर्दू शिक्षक पुरस्कार प्रदान करण्यात आल्याने बीड जिल्ह्याच्या शिरपेचात पुन्हा एकदा मानाचा तुरा रोवला गेला आहे. यामुळे बीड जिल्ह्याच्या शिक्षण क्षेत्रातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत असून पुढील कार्यासाठी भरभरून शुभेच्छा दिल्या जात असून त्यांच्या हातून यापुढेही असेच चांगले कार्य होत राहो अशा सदिच्छा व्यक्त केल्या जात आहेत.

# माजलगाव विधानसभा मतदारसंघात रमेश आडसकरांना सहानुभूतीची लाट

**माजलगाव । प्रतिनिधी**

गेल्या पंचवार्षिक विधानसभा निवडणुकीत निसटत्या मतांनी पराभव होऊनही निकालाच्या दुसऱ्या दिवसापासून मतदारसंघात झालेल्या अवकाळी पावसामुळे झालेल्या नुकसानीची पाहणी करण्यासाठी शेतकऱ्यांच्या बांधावर जाणारा रांगडा नेता म्हणून मतदारसंघात मतदारांच्या पसंतीस उतरलेले अपक्ष उमेदवार रमेश आडसकरांना सहानुभूतीची लाट उसळली असून त्यांच्या मतदारसंघातील सुरु असलेल्या प्रचार दैऱ्यातील विविध गावांतील मतदारांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे.

माजलगाव विधानसभा मतदार संघाचे अपक्ष उमेदवार

रमेशराव आडसकर हे गेल्या



पंचवार्षिक विधानसभा निवडणुकीत निसटत्या मतांनी पराभव होऊनही निकालाच्या दुसऱ्या दिवसापासून मतदारसंघात झालेल्या अवकाळी पावसामुळे झालेल्या नुकसानीची पाहणी करण्यासाठी थेट शेतकऱ्यांच्या बांधावर जाणारा रांगडा नेता म्हणून मतदारसंघात मतदारांच्या पसंतीस उतरलेले अपक्ष उमेदवार रमेश आडसकरांना यांनी दि ०५ नोव्हेंबर रोजी प्रचार दौऱ्या निमित्त तालुक्यातील शुक्लतिर्थ लिमगांव, सोनाथडी,गुंजथडी, सुरुमगांव, निपाणी टाकळी,वसंतनगर तांडा,आनंदगांव, घळाटवाडी,

या गावांमध्ये प्रचार दौऱ्याच्या निमित्ताने भेटी दिल्या.या दौऱ्यात अपक्ष उमेदवार रमेश आडसकरांना सहानुभूतीची लाट निर्माण झाल्याने विविध दैऱ्यातील गाव भेटी दरम्यान मतदारांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

मिळत असल्याने सध्या तरी माजलगाव विधानसभा मतदारसंघात अपक्ष उमेदवार रमेश आडसकरांचीच हवा असल्याची चर्चा रमेश आडसकरांच्या प्रचार दैऱ्या दरम्यान मतदारांत होतांना दिसत आहे.

# घाटा पिंपरी सरपंचाचे कौतुकास्पद कार्य

## स्वखर्चाने रोडचे खड्डे बुजवून दिले माणुसकीचे दर्शन

म्हसोबावाडी । प्रतिनिधी

आष्टी तालुक्यातील घाटा पिंपरी या गावात उतरून जाणारा हायवे बीड ते कल्याण या वरती होणाऱ्या वरधरीमुळे या रस्त्यावर रस्ता कमी अन्? घड्डे जास्त असा काही प्रकार आहे अन्? या खड्ड्यांमुळे अपघात जास्त प्रमाणात होतं आहेत हे घडु नये वर एखाद्या प्रवाशांची जिवानशी जाऊ नये यामुळे घाटा पिंपरी गावचे युवा सरपंच प्रल्हाद मुळीक यांनी आपल्या स्वखर्चाने हे खड्ड्यात मुरुम टाकुन एक माणुसकीचे दर्शन घडुन आणले आहे या त्यांच्या कौतुकास्पद कार्यात



त्यांचे सहकारी मित्र उपसरपंच अमोल तळेकर

,सदाशिव घुमरे ग्रा सदस्य ,युवराज झांजे ,सोमीनाथ घुमरे,गोटु झांजे,ज्ञानदेव घुमरे ,गनपत घुमरे,दादा जगताप हे सहभागी होते या यांच्या कार्यामुळे सर्व ग्रामपंचायतीला व सरपंचला एक चांगला संदेश दिला आहे अन्? या कार्याचे सर्व पंचक्रोशीतुन त्यांच्यावर कौतुकास्पद शुभेच्छा वर्षाव होतं त्यांचे तोंडभरून कौतुक ही केले जातं आहे.

# निर्मळ साहेब ओबीसींना आमिषे दाखवून त्यांच्या भावनांशी खेळणे बंद करा-भागवत दराडे

**दिंद्रुड । प्रतिनिधी**

माजलगाव विधानसभाम मतदार संघात माधव निर्मळ आपल्या राजकीय स्वारथापोटी ओबीसी समाजाची दिशाभूल करून त्यांच्या भावनांशी खेळणे बंद करा. असा इशारा ओबीसीचे युवानेतृत्व भागवत दराडे यांनी करून, निर्मळ यांनी आपली राजकीय पोळी भाजण्यासाठी ओबीसीचा वापर बंद करावा. अन्यथा समाज तुम्हाला माफ करणार नाही. असाही इशारा दराडे यांनी दिला.



यासंदर्भात प्रसिध्दी पत्रकात ओबीसीचे युवानेतृत्व भागवत दराडे यांनी म्हटले आहे की,गेल्या कांही धारूर येथील माधव निर्मळ हे मीच ओबीसीचा नेता असल्याचा आविर्भाव आणुन ओबीसींच्या मतांवर निवडणुक लढववत आपली राजकीय पोळी भाजुन घेण्याचा केविलवाणा प्रयत्न करत आहेत. वास्तविक पाहाता आतापर्यंत ओबीसीच्या एका व्यक्तीला कधीच मदत अथवा सहकार्य न करणाऱ्या निर्मळ यांना निवडणुकीच्या तोंडावरच ओबीसींचा कळवळा कसा आला.हा मोठा प्रश्न असुन,ओबीसींच्या मतांवर डोळा ठेऊन असलेला त्यांचा हा नाटकीपणा सर्वच ओबीसी समाज ओळखून असल्याचे भागवत दराडे यांनी म्हटले.

आ.सोळंके कायम ओबीसींच्या पाठीशी

माजलगाव मतदार संघाचे आ.प्रकाश दादा सोळंके हे सर्व जातीधर्माला सोबत घेऊन चालणारे सर्वसमावेशक नेतृत्व असुन, दादा कधीही जातीभेद करत नाहीत. ते कायमच ओबीसींच्या सोबतच असतात. त्यामुळे या निवडणुकीत ओबीसी समाजाने कुणाच्या भुलथापांना बळी न पडता आ.दादा यांना प्रचंड मतांनी विजयी करावे.असे आवाहन भागवत दराडे यांनी केले.

### मुंडे भाऊ -बहीणीसह समाजास वेठीस धरणे कितपत योग्य

होऊ घातलेल्या निवडणुकीत महायुतीचा धर्म निभावण्यासाठी पालकमंत्री धनंजय मुंडे साहेब व माजीमंत्री आ.पंकजाताई मुंडे हे भाऊबहीण जीवाचे रान करून महायुतीचे उमेदवार विजयी करण्यासाठी परिश्रम घेत आहेत. मात्र माधव निर्मळ या राजकीय स्वार्थी व्यक्ती माजलगाव मतदार संघात भरलेला उमेदवारी अर्ज मागे घ्यावा. म्हणून धनंजय मुंडे व पंकजाताई मुंडे यांनी निर्मळ यांना सांगितले. परंतु निर्मळ यांनी कोणाशीही संपर्क न ठेवता आपला मोबाईल बंद ठेवून मुंडे बहीण भावाची व संपुर्ण समाजास वेठीस धरून एक प्रकारे अपमानच केल्याच म्हणत. अशा व्यक्तीचा माझ्यासह संपुर्ण ओबीस समाज जाहीर निषेध करत असल्याचे ही भागवत दराडे यांनी म्हटले.

### निर्मळ यांच्या रॅलीचा फज्जा

माधव निर्मळ यांनी मंगळवारी माजलगाव येथे रॅली व सभा आयोजित केली होती. या रॅलीत सहभागी वाहनात बसण्यासाठी कार्यकर्तेच नसल्याने या रॅलीचा फज्जा उडाल्याचे दिसुन आले.

# काकडा भजनामुळे फुलसांगवीनगरीत भक्तिमय वातावरण

## श्री. संत वामनभाऊ महाराजांच्या जन्मभूमीत आनंदाला उधाण

शिरूर । शंकर भालेकर

फुलसांगवी येथील श्री.संत वामनभाऊ महाराज मंदिरामध्ये ग्रामस्थांच्या आयोजनातून रोज पहाटे काकडा भजनाचा कार्यक्रम पार पडत आहे. या कार्यक्रमाला गावकऱ्यातून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. शेकडो भाविकांच्या उपस्थितीत पार पडणारा हा काकडा भजनाचा कार्यक्रम फुलसांगवीनगरीचे नव्हे तर परिसराचे ही भक्तिमय वातावरण करून जात आहे.

वैराग्याचे महामेरू श्री.संत वामनभाऊ महाराज यांची जन्मभूमी म्हणजे शिरूर कासार तालुक्यातील मौजे फुलसांगवी हे गाव होय. येथे श्री संत वामनभाऊ महाराज यांचे भव्य मंदिर असून या ठिकाणी गावकऱ्यांच्या आयोजनातून पंचक्रोशीतील भाविक - भक्तांच्या सहकार्यातून या ठिकाणी सातत्यपूर्ण विविध धार्मिक व आध्यात्मिक कार्यक्रम पार पडत असतात. श्री संत वामनभाऊ महाराज यांच्या पुण्यतिथीनिमित्त दर वर्षी होणारा अखंड हरिनाम सप्ताह तर महाराष्ट्रभर आपला नावलौकिक वाढवत आहे. भाऊंची जन्मभूमी हे गाव असल्यामुळे या गावाला तीर्थक्षेत्राचे स्वरूप आणि नावलौकिकही प्राप्त झाला आहे. या ठिकाणी गावकरी, भाविक भक्त अखंडरीत्या नित्य नियमाचे कार्यक्रम करत असतात.शुद्ध एकादशीच्या निमित्ताने भजन तर वद्य एकादशीच्या निमित्ताने या ठिकाणी वारीचे आयोजन ही केले



जात आहे. या दिवशी मंदिरामध्ये विविध धार्मिक कार्यक्रम घेऊन सायंकाळी महाराष्ट्रातील नामांकित कीर्तनकार यांचे किर्तनही दर वारीला आयोजित केले जात आहे. त्यानंतर आलेल्या भाविक भक्तांना अन्न दात्याच्या वतीने फराळाची पंगती दिली जात आहे. वर्षभरातील आनंदाचा व मंगलमय भक्तीरसाचा कार्यक्रम म्हणजे काकडा भजनाचा कार्यक्रम होय. या ठिकाणी चातुर्मासाच्या निमित्ताने शेवटच्या महिन्यामध्ये म्हणजेच अश्विन शुद्ध पौर्णिमा पासून ते कार्तिक शुद्ध पौर्णिमा पर्यंत रोज पहाटे या ठिकाणी काकडा भजन केले जात आहे. या कार्यक्रमाला केवळ भजनी मंडळच नव्हे तर गावातील मोठ्या संख्येने महिला -पुरुष उपस्थित राहून या काकडा भजन आरतीचा आनंद घेत असतात. प्रति वर्षाप्रमाणे याही भाऊंच्या मंदिरामध्ये मोठ्या श्रद्धेने आणि उत्साहाने काकडा भजनाचा कार्यक्रम आयोजित केला आहे. गेल्या तीन आठवड्यापासून चालत असलेल्या या भजनाच्या कार्यक्रमाला याही वर्षी मोठ्या संख्येने उत्स्फूर्त प्रतिसाद दिला आहे. भल्या पहाटे शेकडो भावी भक्त स्नान संध्या आटोपुन नवनवे कपडे परिधान करून वामनभा महाराजांच्या आरतीसाठी आरतीचे ताट घेऊन सज्ज असतात. सुमारे दीड तास काकडा भजनाचा आनंद लुटून आरतीचाही आनंद लुटत असतात. आलेल्या भाविकांसाठी अन्नदाते नाश्त्याची पंगती देऊन या कार्यक्रमाचा आनंद द्विगुणित करत आहेत. पहाटेपासुनच काकडा भजनाचा लाऊड स्पीकरच्या माध्यमातून सर्वदूर आवाज जात असल्यामुळे सकाळच्या वेळी पूर्ण परिसर मंगलमय होऊन जात आहे. आरतीच्या कार्यक्रमाला रोज पाच ते सात दांपत्ये जोडीने उभे राहून श्री संत वामनभाऊ महाराजांची आरती करत असतात. धार्मिक कार्यक्रमाला गावकऱ्यांनी मोठी श्रद्धेची जोड दिल्याने हा कार्यक्रम केवळ परिसरातच नव्हे तर संपूर्ण जिल्ह्यामध्ये अध्यात्मिक क्षेत्रात चर्चेचा विषय होत आहे.

### तरुण भजनी मंडळीच्या सहभागामुळे कार्यक्रमाला बहर

सप्ताह असो की,येरवीचा वारकरी संप्रदायाचा कुठलाही धार्मिक उत्सव असो या महत्वपूर्ण कार्यक्रम म्हणजे काकडा भजन हे होय. मात्र दुर्दैव असं हा कार्यक्रम पहाटे असल्यामुळे तरुण वारकरी, भजनी, गायक वादक काकडा भजनाच्या कार्यक्रमकडे पाठ फिरवत आहेत. यामुळे नाविलाजाणे या कार्यक्रमाची धुरा वृद्ध वारकरी व भजनी मंडळाच्या खांद्यावरती येऊन पडलेली आहे. यामुळे काकडा भजन अवकाळा आल्याची पाहायला मिळते. मात्र फुलसांगवी हे गाव या गोष्टीला अपवाद ठरत आहे. कारण येथील जेष्ठ भजनी मंडळ यांचे मार्गदर्शन व येथील तरुण भजनी मंडळांनी घेतलेले संगीताचे धडे या दोन्हीची सांगड घालून चाललेला हा कार्यक्रम बहरदारपणा वाढवत आहे. टाळ, मृदंग,विना, हार्मोनियम, तबला, तानपुरा आदी संगीत साहित्याच्या वादनातून व उत्कृष्ट साऊंड सिस्टिमच्या ध्वनि प्रसारणातून बहरलेला हा कार्यक्रम भाविक भक्तांना मोठी भुरळ घालीत आहे. या काकडा भनाला ज्येष्ठ भजनी मंडळाबरोबर मोठ्या संख्येने तरुण भजनी मंडळ असल्याने हा कार्यक्रम मोठा वैभवशाली थाटात पार पडत आहे.

फक्त आष्टी मतदारसंघातच कमळाला रोखण्यासाठी घड्याळ निशाणी दिलीय काय?

# फक्त निवडणूकीपुरते दारात येणाऱ्याला थारा देऊ नका-सुरेश धस



आष्टी । प्रतिनिधी

आष्टी विधानसभा मतदारसंघाच्या निवडणूकीचा भाजपा शिवसेना रिपाई या महायुतीचा उमेदवार म्हणून मी आपल्यासमोर उभा आहे. आष्टी मतदार संघात अनेक खेळी खेळल्या जात असून हा फक्त मला रोखण्याचा डाव असून राज्यात महायुती असूनही या मतदार संघातच घड्याळ निशाणी का दिली ? या सर्व खेळी कशासाठी ? हे सर्व सुज्ञ आणि समजदार असलेली जनता समजून घेत असून हा फक्त एका माणसाला रोखण्याचा डाव असून विकास कामासोबत सुखदुःखासह आपल्यात सदैव ३६५ दिवस हजर असून केवळ निवडणूक लागली की आपल्या दारात येणाऱ्याला थारा देऊ नका अशी प्रतिक्रिया महायुतीचे अधिकृत उमेदवार माजी मंत्री सुरेश धस यांनी केली.

२३१,आष्टी-पाटोदा-शिरुर का. विधानसभा मतदारसंघाचे भाजपा- शिवसेना- रि.पा.ई. (आ) आणि मित्र पक्षांचे अधिकृत उमेदवार म्हणून ते गावभेट दौऱ्यात बोलत होते. यावेळी माजी आमदार सुरेश धस पुढे बोलताना म्हणाले की, १९९७ पासून मी आपल्या मतदारसंघात जनसेवेचे काम करत असून गेले दहा वर्षापासून तुमचा लोकप्रतिनिधी नाही तरीसुद्धा विधान परिषदेमध्ये संधी मिळाल्याने मी काही ना काही आपल्याला देण्याचा प्रयत्न केला आहे. विकास कामासोबत सुखदुःखातही मी आपल्या हजर राहिलो आहे तुम्ही जे निवडून दिले ते गेल्या पाच वर्षात किती वेळा तुम्हाला तुमच्या दारात आलेत आणि जे आता अपक्ष म्हणून उभा आहे ते किती वेळा तुमच्या सुखदुःखात सहभागी झाले आहेत प्रत्येकाच्या सुखदुःखात जर माझे कुटुंब तुमच्या संपर्कात असेल तरच मला मतदान द्या कोरोना काळ असो किंवा बिबट्या काळ इतरत्र कोणतीही गोष्ट असो मी आपल्या २४ तास ३६५ दिवस सेवेत राहून तुमची सेवा केली आहे संकटकाळी इथले आमदार कुठे गेले होते विधानसभेचे मतदान झाल्यानंतर आता तुमच्या दारात येतील आणि मतदान मागतील अशा मतदार अशा लोकांना थारा देऊ नका माझ्या दारात येणारा मोकळ्या हाताने कधीच जाऊन दिलेली नाही असे का मी गेल्या अनेक दिवसांपासून जनसेवेत करत आहे मात्र या निवडणुकीत मला महायुतीचे तिकीट मिळाले असताना माझ्या झोपेत दोघं दगड धोक्यात आणण्याचे काम राष्ट्रवादी अजितदादा गटाकडून करण्यात आले आहे हे कितपत योग्य असून याचा निर्णय जनताच घेईल आता मी माझी आष्टा गट ही आई समजत असून १९९९ सारखी परिस्थिती झाली आहे लोकांनीच ही निवडणूक हातात घेतली असून कराची परतफेड करणे

◀◀ पान २ वर

# भगवान पुरुषोत्तमाच्या चरणी नारळ फोडून महायुतीचे उमेदवार प्रकाश सोळंके यांनी केला प्रचाराचा शुभारंभ



माजलगाव । प्रतिनिधी

तालुक्यातील पुरुषोत्तमपुरी येथुन भगवान पुरुषोत्तमच्या चरणी नारळ फोडून महायुतीचे उमेदवार प्रकाश सोळंके यांच्या प्रचाराचा शुभारंभ दि ०५ नोव्हेंबर मंगळवार रोजी सादोळा व किट्टी आडगाव पंचायत समिती गणातील गावाचा कार्यकर्ता मेळावा घेऊन सुरुवात करण्यात आली.

आ.प्रकाश सोळंके यांच्या कार्यकाळात या भागात असलेले भगवान पुरुषोत्तमाच्या प्राचीन मंदिराच्या जिर्णोद्धार व विकासकामांसाठी ५५ कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करुन दिला.तसेचं या भागातील शेतकऱ्यांना खऱ्या अर्थाने वरदान ठरलेला लोणी सावंगी उच्च पातळी बंधारा, आत्ताच ज्या कामाचा शुभारंभ झाला तो सुर्डी ते सादोळा रस्ता.या भागातील प्रत्येक गावातील प्रमुख रस्ते,विविध योजनेअंतर्गत पांदण रस्ते इत्यादी विकासकामे प्रकाश सोळंके यांच्या पाठपुराव्याने पूर्णत्वास गेलेले आहेत.दरवेळी प्रमाणे याही वेळी मोठ्या ताकतीने दोन्ही सर्कल आ.प्रकश सोळंके यांच्या सोबत राहतील अशी ग्वाही उपस्थित जनसमुदायाने दिली.या भव्य मेळाव्यास जेष्ठ नेते अच्युतराव लाटे,शिवाजी रांजवण, शिवसेना शिंदे गटाचे तालुका प्रमुख तुकाराम येवले, भाजपाचे तालुकाध्यक्ष अरुणराव राऊत, रविकांतजी राठोड, नितीन मुंदडा,जयदत्त नरवडे, राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे तालुकाध्यक्ष संभाजी शेजुळ,राजेश घोडे, अमोल शेरकर, यांच्या सह महायुतीचे नेते,सरपंच, उपसरपंच, चेअरमन,कार्यकर्ते यांची उपस्थित होती.

































This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# पुण्यात आरपीआय आठवले गटाला खिंडार !

## राजीनामा दिलेल्या माजी उपमहापौरांची महायुतीविरोधी भूमिका

**पुणे । प्रतिनिधी**

विधानसभा निवडणुकीच्या धामधुमीत केंद्रीय मंत्री रामदास आठवलेंना मोठा धक्का बसला आहे. महायुतीमध्ये रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाला (आठवलेंच्या पक्षाला) सन्मानपूर्वक वागणूक देत नसल्यानं सांगत माजी उपमहापौर, रिपाइंचे नेते डॉ. सिद्धार्थ धेंडे यांनी पक्ष सदस्यत्वाचा राजीनामा दिला होता. पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष रामदास आठवले आणि रिपाइंचे शहराध्यक्ष संजय सोनावणे यांच्याकडे त्यांनी राजीनामा दिला आहे. डॉ. सिद्धार्थ धेंडे यांच्या राजीनाम्यामुळे वडगावशेरी मतदारसंघात महायुतीला फटका बसण्याची शक्यता वर्तवली जात आहे. अशातच राजीनामा दिलेले माजी उपमहापौर सिध्दार्थ धेंडे यांनी महायुती विरोधात भूमिका घेतली आहे. राजीनामा दिलेले माजी उपमहापौर सिध्दार्थ धेंडे यांनी महायुती विरोधात भूमिका घेतली आहे. महायुतीला मतदान न करण्याची कार्यकर्त्यांना शपथ दिली आहे. पुण्यात स्टेशन जवळील डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या पुतळ्यासमोर शपथ दिली आहे. आरपीआय आठवले गटाला गृहीत धरून महायुती काम करत असल्याचा आरोप यावेळी करण्यात आला आहे. विधानसभा निवडणुकीत भाजपने फसवणूक केल्याचा देखील आरोप त्यांनी यावेळी केला आहे. आंबेडकरी जनतेची खदखद आहे, आम्हाला एकही जागा देण्यात आली नाही. भाजपने एक जागा दिली. मात्र, इतर पक्ष तर विचारायला तयार नाहीत, आठवले मंत्री असल्याने ते काही बोलत नाहीत, असा आरोप देखील त्यांनी यावेळी केला आहे. लोकसभा निवडणुकीत महायुतीने रिपाइंला एकही जागा दिली नाही. विधानसभा निवडणुकीमध्ये रिपाइं पक्षाला स्वतंत्र निवडणूक चिन्ह असूनही प्रतिनिधित्व देण्यास टाळाटाळ केल्याचा दावा त्यांनी केला आहे. त्यामुळे कार्यकर्त्यांमध्ये नाराजीचा सूर आहे. त्यामुळे कार्यकर्ते आणि पदाधिकाऱ्यांशी चर्चा करूनच हा निर्णय घेतल्याचंही,' डॉ. धेंडे यांनी राजीनामा देत आठवले यांना दिलेल्या पत्रात नमूद केले आहे.



# नागरी सहकारी बँकांतील कर्मचाऱ्यांना निवडणुकीचे कामकाज देऊ नका-बँक असोसिएशनची मागणी

**पुणे । प्रतिनिधी**

पुणे नागरी सहकारी बँक असोसिएशनने मंगळवारी जिल्हाधिकारी डॉक्टर सुहास दिवसे यांना पत्र दिले असून, त्यामध्ये नागरी सहकारी बँकांतील कर्मचाऱ्यांना निवडणुकीचे कामकाज देऊ नये तसेच त्यासाठी दिलेल्या नोटिसा मागे घ्याव्यात अशी विनंती केली आहे.

या संदर्भात असोसिएशनने केंद्रीय निवडणूक आयोगाने सर्व राज्यातील निवडणूक आयुक्त/अधिकारी यांना दिलेल्या दि. ३० डिसेंबर २०२४ च्या पत्राचा हवाला घेऊन लोकप्रतिनीचा कायदा १९५१ मधील कलम १५९ नुसार ज्या संस्थांना सरकारची मदत आहे अशाच संस्थांचे कर्मचारी कामावर नेमण्यात यावे असे सांगण्यात आले आहे. त्यासाठी मुंबई हायकोर्ट यांनी याचिका क्रमांक ८०५२/२००९,८०३९/२००९,८०८९/२००९,-८१११/२००९ मध्ये दिलेल्या निकालाचा हवाला देऊन कोणत्याही परिस्थितीमध्ये त्याचा भंग होणार नाही याची काळजी निवडणूक अधिकाऱ्यांनी घेण्याची दक्षता घ्यावी असेही कळवण्यात आले असल्याचे नमूद केले आहे.

तसेच या पत्रामध्ये "का या अत्यावश्यक सेवेमध्ये येत असल्याने त्या कायद्यातील तरतुदीनुसार त्यांना निवडणुकीचे काम देता येणार नाही असेही नमूद केले आहे. कारण बँका या लोकांच्या आर्थिक गरजांशी निगडित असल्याने बँकांचे कामकाज बंद पडून चालणार नाही ही वस्तुस्थिती लक्षात घेण्यात यावी असे नमूद करून ॲड.सुभाष मोहिते यांनी म्हटले आहे की, जर बँकांमधील सेवक या कामासाठी नेमण्यात आले तर अनेक बँका बंद राहण्याची शक्यता आहे. तसेच निवडणूक आयोगाच्या पत्रामध्ये अगदीच गरज असेल म्हणजेच जर सरकारी सेवकांचा संप वगैरे अशी अपवादात्मक परिस्थिती निर्माण झाली असेल तरच बँकांचे कर्मचारी घ्यावे असे नमूद केले आहे. ही बाबही सार्वजनिक क्षेत्रातील बँकांना लागू आहे कारण या बँकांना सरकारची मदत आहे. हे नमूद करून सहकारी बँकांमध्ये सरकारचे कोणतेही भांडवल नाही सरकारची कोणती आर्थिक मदत या बँकांना नाही त्यामुळे लोकप्रतिनिधीत्व कायदा १९५१ चे कलम १५९ नुसार सहकारी बँकातील कर्मचाऱ्यांना निवडणुकीचे कामकाजासाठी बोलवता येणार नाही ही बा विचारात घेऊन बँकांना दिलेल्या कारणे दाखवा नोटिसा परत घ्याव्यात व निवडणूक आयोगाने दिलेले आदेश व उच्च न्यायालयाचे आदेश यांचा भंग होणार नाही याची काळजी घ्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

बँक असोसिएशनच्या पत्रात जिल्हाधिकारी यांनी १८ एप्रिल २०२४ रोजी लोकसभेच्या निवडणूक काळामध्ये बँकेतील व अत्यावश्यक सेवेतील कर्मचारी निवडणुकीच्या कामातून वगळण्यात आले असल्याचे नमूद केले असून, त्याबाबत वर्तमानपत्रांमध्ये आलेल्या बातम्यांची कात्रणे जिल्हाधिकारी यांना पाठविण्यात आलेली आहेत.

# डेक्कन लिटरेचर फेस्टिव्हलचे १६, १७ नोव्हेंबरला आयोजन

**पुणे । प्रतिनिधी**

पुण्यातील दकनी अदब फाउंडेशनच्या वतीने शनिवार १६ व रविवार १७ नोव्हेंबर रोजी पाचव्या 'डेक्कन लिटरेचर फेस्टिव्हल'चे आयोजन जंगली महाराज रस्त्यावरील बालगंधर्व रंगमंदिर येथे करण्यात आले आहे. दोन्ही दिवशी सकाळी ११ ते रात्री ११ दरम्यान हा महोत्सव होणार असून, यासाठी सर्वांना विनामूल्य प्रवेश देण्यात येईल. महोत्सवात सहभागी होण्यासाठी इच्छुकांनी संस्थेच्या संकेतस्थळावर आगाऊ नोंदणी करावी, असे आवाहन फाउंडेशनच्या वतीने करण्यात आले आहे.




या वर्षी महोत्सवाचे उद्घाटन ज्येष्ठ अभिनेते, दिग्दर्शक महेश मांजरेकर यांच्या हस्ते शनिवारी सकाळी ११ वाजता होईल. या वेळी प्रशासकीय अधिकारी राहुल रंजन महिवाल आणि अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष लक्ष्मीकांत देशमुख हेदेखील उपस्थित असतील. महोत्सवाविषयी अधिक माहिती देताना फाउंडेशनचे संचालक जयराम कुलकर्णी म्हणाले की, दरवर्षीप्रमाणे या वर्षी एकाहून एक सरस कार्यक्रम, मुशायरे, मुलाखती, चर्चासत्रे, नाटक आणि सांगीतिक कार्यक्रम यांची रेलचेल डेक्कन लिटरेचर फेस्टिव्हलचे आकर्षण ठरणार आहे. या व्यासपीठाच्या माध्यमातून प्रसिद्ध कलाकारांसोबतच नवोदित कलाकारांची कला रसिकांसमोर येण्यासाठी एक हक्काचे व्यासपीठ उपलब्ध करून देण्यास आम्ही कायमच प्रयत्नशील आहोत. मराठीसोबतच, हिंदी, उर्दू या भाषांमधील साहित्याचा उत्सव साजरा करण्याचा आमचा प्रयत्न आहे. याही वर्षी सुप्रसिद्ध कलाकारांसोबत साहित्य, कविता, नाट्य, चर्चासत्रे, सांगीतिक कार्यक्रम, गझल, मुशायरे यांची मेजवानी रसिकांना मिळेल, असे महोत्सवाच्या समन्वयिका मोनिका सिंग यांनी सांगितले.

# उंबरे येथे तीन लाख रुपयांचे नुकसान

**नसरापूर । प्रतिनिधी**

उंबरे (ता.भोर) येथील गट क्रमांक ४० मधील सव्वा एकर उसाला रविवारी (ता.३) दुपारी अडीच वाजण्याच्या सुमारास शॉटसर्किटमुळे आग लागली. यामुळे शेतकरी पंढरीनाथ सर्जेराव खुटवड यांचे तीन लाख रुपयांचे नुकसान झाले.या घटनेची राजगड पोलिस ठाण्यात नोंद करण्यात आली आहे.

उसाला आग लागल्याची माहिती मिळताच खुटवड यांनी मुलांसह शेताकडे धाव घेतली व आग आटोक्यात आणण्याचा प्रयत्न केला. तोपर्यंत मोठ्या प्रमाणात ऊस जळाला होता.

शेताजवळून गेलेल्या विद्युत खांबावर र शार्टसर्किट होऊन ठिणग्या शेतात पडल्याने हा ऊस पेटल्याचा लागल्याची माहिती शेतकरी पंढरीनाथ खुटवड यांनी राजगड पोलिस ठाण्यात दिली आहे. दरम्यान, महसूल विभागाच्या वतीने तलाठी अर्चना ठाकूर यांनी जळालेल्या उसाचा पंचनामा केला असून, अंदाजे तीन लाख रुपयांचे नुकसान झाले असल्याचे नमूद केले आहे. वीज वितरण कंपनीचे अभियंता योगेश कारळे यांनी देखील घटनास्थळी भेट दिली व नुकसानीचे तसेच वीज वितरण कंपनीच्या विद्युत खांबाची पाहणी केली. शेतकरी पंढरीनाथ खुटवड यांनी झालेल्या नुकसानीची भरपाईची मागणी केली आहे.

# माधुरी मिसाळच मारणार विजयाचा चौकार-पंकजा मुंडे

**पुणे । प्रतिनिधी**

विविध विकासकामांचा प्रशासनाकडे सातत्याने पाठपुरावा करण्याची आमदार माधुरी मिसाळ यांची हातोटी वाखाणण्याजोगी आहे. प्रशासनावर त्यांचा चांगला अंकुश आहे. पर्वती मतदारसंघात त्यांच्यामुळे मोठे विकास प्रकल्प उभे राहू शकले. राज्यातील शहरी मतदारसंघासाठी त्यांनी पर्वतीमध्ये केलेला विकास अनुकरणीय आहे, त्यामुळेच माधुरी पर्वती मतदारसंघातून विजयाचा चौकार मारत विजयी होतील, असा विश्वास भाजपच्या राष्ट्रीय चिटणीस आमदार पंकजा मुंडे यांनी मंगळवारी व्यक्त केला. मिसाळ यांच्या प्रचाराच्या शुभारंभाच्या



पदयात्रेत त्या बोलत होत्या. जनता वसाहत परिसरात ही पदयात्रा काढण्यात आली.

यावेळी शहराध्यक्ष धीरज घाटे, दीपक मिसाळ, श्रीकांत पुजारी, अनिता कदम, आनंद रिठे, संतोष कदम, राजू कदम, सुनील बिबवे, विश्वास ननावरे, विनया बहुलीकर, महेंद्र गावडे, दैविक विचारे, श्रुती नाझिरकर, महेश बाटले, अक्षय वायाळ, बुवागिरी जीवन माने, सुधीर कुरुमकर, सुजित सामदेकर, बंडू सकपाळ, विशाल डहाळे, अमर हिंगमिरे उपस्थित होते.

दरम्यान, मतदारसंघात विविध विकास कामे आतापर्यंत मार्गी लावली असल्याने मतदार पुन्हा एकदा मला विक्रमी मतांनी निवडणुकीत विजयी करतील, असा विश्वास आमदार मिसाळ यांनी यावेळी बोलताना व्यक्त केला.

# बाबीरच्या यात्रेमध्ये अवैध दारू विकणाऱ्यांवर गुन्हा

**वालचंदनगर । प्रतिनिधी**

येथील बाबीर देवाच्या यात्रेमध्ये बेकायदा दारू विकणाऱ्यांवर वालचंदनगर पोलिसांनी छापा टाकून ३५ हजार रुपयांची विदेशी दारू जप्त केली. याप्रकरणी दोन जणांवर गुन्हा दाखल केला आहे.

शेखर भानुदास पांढरपिसे (वय ३०, रा. रुई) व कृष्णा गोरख धायगुडे (रा. शेटफळ हवेली) अशी गुन्हा दाखल झालेल्यांची नावे आहेत.

वालचंदनगर पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, रुई गावाजवळ दिवाळीमध्ये बाबीर देवाची यात्रा भरते. यात्रेमध्ये हजारो भाविक बाबीर देवाच्या दर्शनासाठी येत असतात. दिवाळीच्या पाडव्यादिवशी यात्रेचा मुख्य दिवस असतो. रविवार (ता. ३) पाडव्या दिवशी रोजी दुपारी दीडच्या सुमारास बाबीर

देवाच्या मंदिराच्या पाठीमागील डोंगराच्या बाजूला असणाऱ्या भानुदास महादेव पांढरपिसे यांच्या शेतातील घराच्या आडोशाला छापा टाकून ३५ हजार ८५७ रुपयांच्या विदेशी दारूचा साठा जप्त केला. अवैध दारू विकणाऱ्या शेखर पांढरपिसे व कृष्णा धायगुडे यांच्यावर गुन्हे दाखल केले आहेत. सहाय्यक पोलिस निरीक्षक राजकुमार डुणगे, उपनिरीक्षक रतिलाल चौधर, हवालदार शैलेश स्वामी, गुलाब पाटील, गणेश काटकर, जगदीश चौधर, विक्रमसिंह जाधव, किसन बेलदार, ज्योती डिसले, वर्षा जामदार, नीता किर्दक यांनी या कारवाईत सहभाग घेतला.

# उन्नतीची दिवाळी पहाट ठरली सुरमयी

## सदाबहार मराठी-हिंदी गाण्यांना रसिकांची दाद

**पुणे । प्रतिनिधी**

आली माझ्या घरी ही दिवाळी, पाहिले न मी तूला, दिन दिन दिवाळी..गाई म्हशी ओवाळी... यासह मराठी आणि हिंदी चित्रपटातील सदाबहार गीतांनी उन्नती सोशल फाउंडेशनची दिवाळी पहाट सुरमयी ठरली.

उन्नती सोशल फाउंडेशनच्या वतीने पिंपळे सौदागर येथील पिके इंटरनॅशनल स्कूलच्या प्रांगणात शनिवार दि. २ आणि रविवार दि. ३ रोजी स्वरामृत दिवाळी पहाट तर संध्याकाळी अभंग रिपोर्ट हा कार्यक्रम रसिकांच्या प्रतिसादात उत्तरोत्तर रंगत गेला. या कार्यक्रमास शंकरशेठ जगताप, आमदार अश्विनीताई जगताप,




विजयभाऊ जगताप, बापू काटे, निर्मला कुटे, जयनाथ काटे, जगन्नाथआप्पा काटे, मल्हारी कुटे, बाळासाहेब काटे, विजय भिसे, राजू भिसे, भानुदास काटे पाटील, धनंजय भिसे, प्रकाश झिंजुर्डे,अतुल पाटील, अमोल नखाते, विशाल काटे, शंकर चोंधे तसेच विठाई वाचनालय, हास्य क्लब, ज्येष्ठ नागरिक संघ, सर्व ज्येष्ठ नागरिक ऑल सिनिअर सिटीजन असोसिएशनचे सदस्य आणि पिंपळे सौदागरमधील रहिवासी मोठ्या संख्येने उपस्थित होते दोन दिवस चाललेल्या या कार्यक्रमात प्रसिद्ध गायक रविंद्र खोमणे, अश्विनी मिठे, प्रियंका ढेरंगे, अंजली गायकवाड आणि नंदिनी गायकवाड यांनी आपल्या सुरेल आवाजात हिंदी, मराठी हितांचे सादरीकरण करून प्रेक्षकांना मंत्रमुग्ध केले. तर, अवधूत गांधी यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्यावर गीत गायन करून ऐतिहासिक क्षणांना उजाळा दिला. अभंग रिपोस्ट या सुप्रसिद्ध कार्यक्रमाने स्वरामृत दिवाळी संध्याची सांगता करण्यात आली.

# जैन संस्कृतीला समर्पित असलेल्या 'अभय प्रभावन' संग्रहालयाचे नितीन गडकरी यांच्या हस्ते उद्घाटन

**पुणे ।प्रतिनिधी**

जैन तत्त्वज्ञान आणि भारतीय वारसा यांना समर्पित असलेल्या 'अभय प्रभावन' या संग्रहालयाचे केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते मंगळवारी (ता. ५) उद्घाटन करण्यात आले. ५० एकर जागेत ३.५ लाख चौरस फूट बांधकाम असलेले हे संग्रहालय मावळ तालुक्यात इंद्रायणी नदीच्या निसर्गरम्य काठावर पारवडी येथे उभारण्यात आले आहे.

जैन मूल्यांची सखोल समज निर्माण करणे, भारतीय मूल्य प्रणालीवर आणि समकालीन समाजात जैन मूल्यांची प्रासंगिकता यावर आधारित असणाऱ्या या संग्रहालयाची स्थापना 'अमर प्रेरणा ट्रस्ट'चे अध्यक्ष अभय फिरोदिया यांनी केली आहे. उद्घाटन समारंभास पद्मश्री गुरुदेवश्री राकेशजी (धरमपूर), पद्मश्री आचार्य चंदना जी महाराज (वीरायतन), दलाई लामा यांचे प्रतिनिधित्व करणारे परमपूज्य सीलिंग टोंगखोर रिनपोचे, केंद्रीय दळणवळण आणि पूर्वोत्तर क्षेत्र विकास मंत्री ज्योतिरादित्य सिंदिया, ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे, हेग येथील आंतरराष्ट्रीय न्यायालयाचे न्यायमूर्ती दलवीर भंडारी, मेवाडचे महाराज कुमार लक्ष्यराज सिंह, केंद्र सरकारच्या पर्यावरण आणि वन राज्यमंत्री (स्वतंत्र प्रभार) मनेका गांधी आणि पद्मभूषण डी. आर. मेहता उपस्थित होते.

# कसब्यातील निवडणुकीच्या रिंगणात १२ उमेदवार

**पुणे । प्रतिनिधी**

कसबा विधानसभा मतदारसंघातून दोन अपक्ष उमेदवारांनी सोमवारी अर्ज माघारी घेतले. त्यामुळे आता एकूण १२ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात असणार आहेत. कसबा मतदारसंघातील अर्ज माघार आणि मंजूर अर्जांबाबत माहिती देण्यासाठी कसबा मतदारसंघातील निवडणूक निर्णय अधिकारी स्नेहा किसवे-देवकाते यांनी पत्रकार परिषदेचे सोमवारी (दि. ०४) आयोजन केले होते. त्या वेळी त्यांनी ही माहिती दिली. या वेळी त्या म्हणाल्या, निवडणूक लढविण्यासाठी कसब्यात आमच्याकडे २९ अर्ज आले होते. यातील २० अर्ज मंजूर करण्यात आले. काही उमेदवारांनी चुकू नये म्हणून दोन किंवा तीन अर्ज भरले होते. यात एकूण मिळून १२ उमेदवार आता कसब्यातून निवडणुकीच्या रिंगणार असणार आहेत, तर एक नोटासाठी पर्याय असणार आहे.

अलीकडील काळात कसबा मतदारसंघातील विधानसभेची निवडणूक खूपच अटीतटीची होत आहे. या मतदारसंघातील निवडणुकीकडे संपूर्ण देशाचे आणि वरिष्ठ पक्षश्रेष्ठींचे लक्ष लागून राहिलेले आहे. त्यामुळे या मतदारसंघातून निवडणूक लढविण्यासाठी एकूण २१ उमेदवार इच्छुक होते. त्यातील ७ जणांचे अर्ज बाद करण्यात आले आहेत, तर दोन अपक्ष उमेदवारांनी अर्ज माघारी घेतले आहेत.

यात मुख्तार गफूर शेख आणि आकाश विजय खांडेकर यांनी अर्ज माघारी घेतले. या दोघांच्या माघारी घेण्यामुळे निवडणूक लढविणार्या कोणत्या उमेदवाराला फायदा होणार आहे, हे पाहावे लागणार आहे. मूळ काँग्रेसच्या असलेल्या कमल व्यवहारे यांना काँग्रेसमधून उमेदवारी न मिळाल्यामुळे त्यांनी अपक्ष म्हणून अर्ज भरला आहे. त्या अपक्ष म्हणून 'किटली' या चिन्हावर निवडणूक लढणार आहेत. त्यांच्या उमेदवारीचा फटका बसणार, हे देखील पाहावे लागणार आहे. १२ उमेदवारांची लढत मोठी जंगी होणार असल्याचे चित्र पाहायला मिळत आहे.

# ...अखेर त्या डॉक्टर, परिचारिकांवर गुन्हा दाखल

**पिंपरी । प्रतिनिधी**

पायाजवळ वॉर्मर मशीन ठेवल्याने गुडघ्याखालील पाय जळल्याने दोन वर्षाच्या बाळाचा मृत्यू झाला. ही घटना चिखलीतील इम्पिरीअल रुग्णालयात १८ नोव्हेंबर २०२३ रोजी घडली. ससून रुग्णालयातील समितीच्या अहवालात उपचारात हलगर्जीपणा झाल्याचे निष्पन्न झाल्याने तीन डॉक्टरांसह दोन परिचारिकांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दिरांश रमाकांत गादेवार (वय २) असे मृत्यूमुखी पडलेल्या मुलाचे नाव आहे. याबाबत त्याची आई दीपाली गादेवार (वय ३६, रा. नेवाळेवस्ती, चिखली) यांनी मंगळवारी (दि. ५) चिखली पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी डॉ. जितेश मदनसिं दाभोळ, डॉ. रजनिश जगदंबाप्रसाद मिश्रा, डॉ. रोहन प्राणहंस माळी, परिचारिका रेचल अनिल दिवे, सविता नंदकिशोर वरवटे यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

वॉर्मरमुळे पाय जळाला

फिर्यादी दीपाली यांच्या मुलाला सर्दी झाल्याने त्यास डॉ. दाभोळ यांच्या सल्ल्यानुसार नेवाळेवस्ती, चिखली येथील इम्पिरीअल रुग्णालयात दाखल केले. त्यांच्यावर उपचार सुरू असताना १८ नोव्हेंबर रोजी सकाळी सात वाजताच्या सुमारास डॉ. मिश्रा, डॉ. रोहन हे बाळाचे सॅम्पल घेण्यासाठी आले. त्यांनी दिरांश याच्या आईला बाहेर थांबण्यास सांगितले. त्यानंतर सकाळी आठ वाजताच्या सुमारास दीपाली या पुन्हा मुलाजवळ आल्यानंतर त्यांना धक्काच बसला. बाळाच्या पायाजवळ ठेवलेल्या वार्मर मशीनमुळे बाळाचा गुडघ्याखाली पाय पूर्णपणे जळाला. या घटनेत दिरांश याचा मृत्यू झाल्याचे डॉक्टरांनी सांगितले.

# महिलांच्या सुरक्षेला सर्वाधिक प्राधान्य-चंद्रकांत मोकाटे

**पुणे । प्रतिनिधी**

कोथरूडमधील महिलांना भेडसावणाऱ्या विविध समस्या, अडचणी सोडविण्याला प्रथम प्राधान्य दिले जाणार आहे. विशेषतः महिलांच्या सुरक्षेतेला महत्व देत, कोथरूडचे वातावरण महिलांसाठी सुरक्षित राहील, याकडे लक्ष असेल असे मत कोथरूड विधानसभा मतदारसंघातील महाविकास आघाडीचे उमेदवार व माजी आमदार चंद्रकांत मोकाटे यांनी व्यक्त केले.

मोकाटे हे भाऊबीजेला कर्वेनगर येथील विठ्ठल-रुक्मिणी मंदिर, किष्किंधानगर, सुतारदरा यासह अन्य ठिकाणी मंदिरात काकड आरती सोहळ्यात सहभागी झाले. यावेळी महिलांनी




त्यांचे औक्षण करत भाऊ म्हणून नेहमी पाठीशी राहा, महिलांसाठी कोथरूड सुरक्षित व्हावे' अशी मागणी मांडली. त्यावेळी भावूक झालेले मोकाटे म्हणाले, महिला अत्याचार रोखण्यासाठी कडक पावले उचलणे आवश्यक आहे. त्यासाठी मी स्वतः प्रयत्न करणार आहे. केवळ कोथरूड नव्हे, तर पुणे शहरात याबाबत जनजागृती करणार आहे. विविध ठिकाणी महिलांसाठी मोफत कायदेशीर सल्लागार संपर्क कार्यालय सुरू करणार. महाविद्यालये आणि शाळांमध्ये चौकशी समिती स्थापन करून दरमहा त्याची बैठक घेणार आहे.'